१८२८

म. ग्रं. सं. ठाणे

विषय काव्य

सं. क्र.

REFBK-0003971

. सं. ठाणे

# मोगरा.

( हृदयंगम खंडकाव्य.)

"तूंच कारणीं, कार्य तुझें तूं, शेवट तूंच खरा"
तुझ्याचसाठीं कवि--हृदयाची ओंजळ सुकुमारा.

मोगरा.

किंमत १२ आणे

कवि
बन्सीधर.

# मोगरा.

विचारक्रांतिकारक हृदयंगम खंडकाव्य.

कवि—बन्सीधर.

( खंडेराव भिमराव कुळकर्णी. )

REFBK-0003971

REFBK-0003971

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५९०७.

आवृत्ति पहिली.

सन १९२९.

किंमत १२ आणे.

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-९६ शनवार पुणें.

आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांना
अलभ्य लाभ !
' सगुण-भजनामृत. '
१५० पानी अभंगांचा अपूर्व ग्रंथ.
सर्व संत-अभंगांचे उतारे.
प्रस्तावकः—ब्रह्मीभूत श्री. बाबा गर्दे.
संग्राहकः—कॅप्टन, अनंत कृष्ण नूलकर.
एल्. एम्. अँड एस्.
३४२ सदाशिव पुणें.

' मोगरा ' काव्याचे

( सर्व हक्क लेखकाकडे )

श्री. ' कृष्ण ' ( म. रा- उपासनी ) यांचीं पुस्तकें
लवकरच प्रसिद्ध होतील !
सुंदर लघुकथांचा संग्रह.
१ अश्रु आणि फुलें
( हृदयंगम कादंबरी )
२ मंदाकिनी
( एका ओजस्वी नर्सचा तेजस्वी वृत्तांत )

प्रकाशकः—रामदास नारायण नाईक,
तुकारामाश्रम, टिळकवाडी, पुणें नं. २.

# आम्ही.

बालपणापासून हृदयाशीं बाळगलेल्या आशेला मूर्तस्वरूप आलेलें पाहून कुणाला आनंद वाटणार नाहीं ? **म[illegible] स्कूल, जळगांव ( खानदेश )** या शाळेंत वाङ्मयाची नैसर्गिक आवड असलेल्या [illegible]यांनीं एका वाङ्मयोपासक मंडळाची स्थापना केली. हस्तलिखित मासिक चालवून गुरुजनांत कौतुक उत्पन्न करून त्यांचे आशीर्वाद मिळविले; त्यावेळींच असें वाटावें कीं, आपण आपलें मासिक छापून काढावें, पण त्या वेळची ती आशा जरी कल्पनारम्य असली तरी अशक्य कोटींतील होती.

तेंच मंडळ आपल्या सहा वर्षांच्या अव्याहत परिश्रमानें आज महाराष्ट्ररसिकांपुढें येत आहे. मंडळाच्या सुरुवातीपासून मंडळाच्या मित्रगणाला आज परमानंद नव्हे–स्वर्गीय आनंद–होत आहे. मंडळ स्थापन करणाऱ्या कांहीं व्यक्ति मंडळ सोडून गेल्या; कांहींना सोडावें लागलें. मंडळालादेखील परिस्थित्यनुरूप ' **ज्ञानोदयमंडळ** ' याऐवजीं ' **विद्या–विहार–मंडळ** ' असें नामांतर करावें लागलें. पण देवी शारदेच्या आशीर्वादानें मंडळ आपलें काम हौसेनें करीत आहे; इतकेंच नव्हे तर मंडळाच्या एका सभासदाचें १०० पानांचें अतीव सुंदर ' मोगरा ' खंडकाव्य मंडळ आज अखिल महाराष्ट्ररसिकांच्या सेवेला मोठ्या अभिमानानें सादर करीत आहे.

मंडळाची घटना करण्यांत जसे ' **बन्सीधर** ' प्रमुख, तसेच महाराष्ट्ररसिकांची मंडळातर्फे सेवा करण्याचा मान मिळविण्यांतदेखील **बन्सीधरांचा** नंबर पहिला ! **बन्सीधरांनीं** मंडळाला पुढें आणावें आणि मंडळानें **बन्सीधरांना** पुढें आणावें हें परस्परांचें रहस्य फार गोड आहे. **बन्सीधर** मंडळाचा मोहरा आहे. **बन्सीधर व मोगरा** यांचा परिचय स्वतंत्ररीत्या दुसरीकडे करून दिला आहे. **बन्सीधरांच्या** मोगऱ्याची योग्यता रसिक ठरवितीलच ! पण मंडळाला मोगरा अत्यंत भूषणावह वाटतो आणि त्याच्याबद्दल व **बन्सीधरा**बद्दल अभिमान वाटतो. मंडळाचा असा पूर्ण आत्मविश्वास आहे कीं, ' **बन्सीधरांच्या** मोगऱ्यानें महाराष्ट्र–सारस्वतांत एका उत्तम रत्नाची भर पडेल; व **मोगरा** आधुनिक मराठी खंडकाव्यांत उच्च दर्जाचा ठरेल. '

**बन्सीधरां**चें आणि मोगऱ्याचें कल्पनारम्य वैशिष्ट्य हेंच कीं, मोगऱ्याचा व महाराष्ट्र-रसिकांचा परिचय नाहीं. मोगरा कोणत्याही नियतकालिकांतून प्रसिद्ध झाला नाहीं. त्यानें रसिकांची आवड अजमावली नाहीं, तरीही मोठ्या धैर्यानें स्वतंत्र पुस्तकरूपानें **बन्सीधरांचा** मोगरा प्रसिद्ध होत आहे महाराष्ट्ररसिकांपुढें मोगरा आणतांना मंडळाला निरुपम आनंद होत आहे. श्रीशारदेचा आणि रसिकांचा मंडळावर सदा शुभाशीर्वाद असावा हीच प्रार्थना !

**रामदास नारायण नाईक**. चिटणीस

भाऊबीज.
तारीख ३–११–२९.

विद्या–विहारमंडळ, तुकारामाश्रम, टिळकवाडी.
पुणें नं. २.

---

# रहस्य.......

प्रस्तुत काव्यपुष्प जनतेपुढें आणावयाच्चें. तें. एखाद्या दर्दी बागवानाकडून आणावें या हेतूनें श्री. बन्सीधर यांनीं तें माझे जळगांवचे मित्र, कवि श्री. के. म. सोनाळकर वकील आणि काव्यवेत्ते यांजकडे पाठविलें; त्या काव्यास प्रस्तावना लिहावी, म्हणून श्री. सोनाळकरांनीं तें वाचलें व प्रस्तावना लिहिण्याचा प्रयत्न केला; पण सदर काव्यास प्रस्तावना लिहिण्यास आपण असमर्थ आहोंत, म्हणून त्यांनीं मला पत्र लिहिलें. त्या पत्राचे दोन भाग असून एक सकाळीं व एक संध्याकाळीं माझेकडे आला ! आणि तीच रहस्यमय प्रस्तावना असें समजून त्यांचीं पत्रें जशींच्या तशींच दिलीं आहेत. काव्य–वाचनानें झालेल्या आपल्या मनस्थितीच्या कोरींव प्रतिबिंबापेक्षां काव्याला अधिक चांगली प्रस्तावना कोणती असणार ?

३४२ सदाशिव, पुणें. } कॅप्टन्–**अनंत कृष्ण नूलकर,**
एल्. एम्. अँड एस्.

जळगांव ता. २०।१०।२९.

प्रिय × × × × यांस सा. न. वि. वि. श्री. बन्सीधर यांच्या ' मोगरा ' काव्यास प्रस्तावना लिहिण्याचा मी कालपासून प्रयत्न करीत आहें. आज पहांटे चार वाजल्यापासून उठलों व लिहायला बसलों, परंतु माझ्या दुर्दैवानें लेखनास जी मनस्थिति ( Mood ) असावी लागते व जी एकाग्रता लागते ती साध्य झाली नाहीं. अंतस्फूर्ति शून्य झाल्यामुळें निर्जीव शब्दांच्या डोलाऱ्यांनीं प्रस्तावना लिहिणें मला कसेंसेंच वाटतें. अलीकडे माझ्या अंतःकरणांत भावना मृत होऊन केवळ तिचें स्मृतिपिशाच्च मात्र हृदयाच्या थडग्यांत वावरते आहे. अर्थात् हा भूताचा नाच म्हणजे काव्यानुकूल परिस्थिति खास नव्हे. पूर्वस्मृतीच्या जोरावर एकाद्या काव्यांतील भावना जरी मी क्षणमात्र अनुभवूं लागलों, तरी दुसऱ्या क्षणीं निखाऱ्यावर पाणी ओतल्यामुळें त्याचे जसे कोळसे होतात; त्याप्रमाणें क्षणमात्र उद्भूत होणाऱ्या भावनांचे

कोळसे होतात. कसेंही असलें, तरी ही मनस्थिति लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं; व या मनस्थितीच्या अभावीं कोमल भावनांत शिरून भावनामय प्रस्तावना लिहिणेंही शक्य नाहीं. मनाची एवढी खात्री झाल्यावर शारदादेवीचा वेणीसंहार (!) करणारा दु:शासन मात्र मी होऊं इच्छित नाहीं. तिच्याच कृपाप्रसादानें जरी तिनें भावनेचें वाटोळें केलें असलें, तरी तत्त्वज्ञानाची धगधगीत आग ठेविली गेली आहे; व याच तिच्या कृपेच्या जोरावर तिनें आंखून दिलेल्या प्रांताबाहेर न जाण्याचें मला ठरविणें भाग आहे. श्री. बन्सीधर यांना माझ्या नकारानें वाईट वाटेल, हें मी जाणून आहें, पण तेही प्रतिभावान् कवि असल्यामुळें भावनेची योग्यता व तिच्या अभावीं वाटणारी विषण्णता ते जाणूं शकतील. मी कवि नव्हे, काव्यरसिकही नव्हे; तर रुक्ष तत्त्वज्ञानाच्या वाळवंटांत शारदादेवीच्या रोषानें—अगर कृपेनें—भटकणारें एक पिशाच्च आहें. मला क्षमा करा. प्रस्तावना लिहिण्यास मी असमर्थ आहें. मी हें पत्र अत्यंत खिन्न अंत:करणानें लिहीत आहें. '**मोगरा**' काव्यांतील **श्रीधरा**प्रमाणें मीही भावनेच्या समाधीवर अश्रुवर्षावच करीत आहें. अर्थात् चिरशांति घेणारें थडग्यांतील भावनेचें पिशाच्च उकरून काढण्याचें अमानुष कृत्य मला करतां येणार नाहीं. कळावें.

आपला प्रेमाभिलाषी,

**के. म. सोनाळकर** वकील, जळगांव.

प्रिय × × × सकाळीं पाठविलेल्या पत्राच्या शेवटीं खालील दोन ओळी घालाव्या.

**दिव्य अत्यंतिक तरल भावना ना !**
**स्थूल शब्दाचा देह साहवेना ॥**

आपला प्रेमाभिलाषी,

ता. २०।१०।२९. **आप्पा.**



वन्सीधर.

# बन्सीधर व मोगरा.

मोगरा आणि बन्सीधर व बन्सीधर आणि मोगरा ही रसिकांची उत्कंठा वाढविणारी जोडी महाराष्ट्र-स्वारस्वतांत निर्माण होत असलेली पाहून खऱ्या जातिवंत शारदोपासकांना आनंद झाल्याखेरीज रहाणार नाहीं. बन्सीधरासाठीं मोगरा नसून मोगऱ्यासाठीं बन्सीधरांना पुढें यावें लागत आहे, पण मोगरा म्हणतांच बन्सीधर आणि बन्सीधर म्हणतांच मोगरा एवढ्या संकुचित क्षेत्रांतच रसिकांच्या विशाल जिज्ञासेची व्याप्ति होऊं शकत नाहीं, हें खरें आहे. पण मोठ्या दुःखानें म्हणावें लागत आहे कीं, जोंपर्यंत नियतकालिकांच्या साहित्यसृष्टींत कलेची अवहेलना थांबत नाहीं, तोंपर्यंत अशा जिज्ञासा तृप्त होऊं शकत नाहींत. संपादकांची वैयक्तिक खुषी नाखुषी हीच 'साहित्याची विल्हेवाट' अशा तऱ्हेचा जुलूम आज बिनहरकत सारस्वतांत चालू आहे; आणि त्यामुळें मराठी रसवंतीच्या वैभवावर पाहिजे तसा प्रकाश पडत नाहीं. मोठमोठीं मासिकें चालविणारे घमेंडखोर संपादक आणि त्यांचे सांप्रदायिक हेच आमच्या अभिनव सारस्वतांच्या उत्साही जीवनाचे काळ आहेत.

श्री. बन्सीधर हे एक उदयोन्मुख कवि असून अगदीं अनपेक्षितपणें महाराष्ट्ररसिकांच्या पुढें आले आहेत. त्यांच्या काव्याचा अभ्यास आणि साहित्याचा व्यासंग जरी बरेच दिवसांपासून चालू असला तरी नियतकालिकांच्या जगावर बहिष्कार घातल्यामुळें ते महाराष्ट्रसारस्वताला आज नवखेच आहेत. तेव्हां अर्थातच **मोगरा** हे **बन्सीधर** कवींचें काव्य आहे यापलीकडे आणखी काय ओळख करून देणार?

साहित्य आणि सारस्वत या आपद्ग्रस्त जीवनाचा विचार केला तर अभिनव सारस्वताच्या कर्तृत्वाला उत्तेजन देणें हेंच खरें वाङ्मयाच्या उन्नतीचें लक्षण आहे. पण पुढें येणें यांत निवळ उतावळेपणाच भरून आहे, अशीच खुळी समजूत होऊन बसल्यामुळें किती तरी उत्कृष्ट प्रसव आज हस्तलिखित चोपड्यांतून कुचंबत पडले

आहेत, यांत वाङ्मयाची मोठी हानि आहे. पण तिकडे कोणाचेंच लक्ष पोंचत नाहीं, हें मोठें दुर्दैव आहे. साहित्यजीवन आणि आपत्ति यांचें साहचर्य फार पुरातन असून तें असेंच सनातन राहील अशी खात्री आहें. मानसिक व शारीरिक दुःखें आणि आधिभौतिक आणि आधिदैविक आपत्ति यांबरोबरच साहित्य-दौलतीवर पडणारा घाला ही एक अत्यंत हृदयस्पर्शी आपदा आहे; आणि बन्सीधरांच्या आपद्ग्रस्त जीवनांत अशा तऱ्हेच्या आपत्तीनें मात केली आहे. सरासरी १५० भावगीतांचा बन्सीधरांचा कवितासंग्रहच एक वर्षापूर्वी हरवला असून आजपर्यंत अनेक प्रयत्न करू-नही तो हातीं आलेला नाहीं, व बरीच चौकशी केल्यावरही शेवटीं त्या बाबतींत निराशाच दिसत आहे.

मोगरा काव्याचा शब्दसंग्रह रमणीय असला तरी त्याचें कथानक सत्य-सृष्टींतील हुबेहूब चित्र असून रसिकांच्या सोईसाठीं त्याला कल्पनासृष्टीचा साज चढवला आहे. ‘ प्रथमदर्शनी प्रेम ’ हा काव्याचा प्रधान हेतु असून भावना व व्यवहार यांत केवढा विपर्यास पसरला आहे, हें निवेदन करणें हेंच त्याचें प्रयोजन आहे.

‘ Love at the first sight ’

प्रथम दर्शनी प्रेम हीच रहस्यमय सुरुवात ‘ मोगरा ’ काव्याची असून व्यावहारिक जीवनांतील तिच्या यशस्वितेची अशक्यता हाच काव्याचा हृदयस्पर्शी शेवट आहे. प्रथमदर्शनी प्रेम हें भावनाप्रधान जीवनांतील एक हृदयंगम दिव्य आहे. या दिव्याच्या विद्युत्स्पर्शानें प्रथमतः अंतःकरणांतील गांभीर्य नाहींसें होऊन एक प्रकारचें असह्य अस्वास्थ्य निर्माण होतें आणि त्यांत आशा आणि उत्कंठा यांची विवेकाशीं—विकाराची—झुंज सुरू असते. विवेकाचा वरचढपणा साह-जिकच हितपरिणामीं असतो, पण आशा आणि उत्कंठा या कोमल आणि हळुवार भावनांची प्रत्यहीं होणारी कुचंबणा जीवनांत अधिकाधिक नैरा-श्याची भर घालीत असते. हाच प्रेमी जीवांच्या जीवनांतील निर्वाणीचा काळ असतो. कुठल्याही प्रकारचें तत्त्वज्ञान ऐकायला या वेळीं अंतःकरण तयार नसतें. कसल्याही विचारसरणीनें चित्ताची समजूत पटत नाहीं; आणि काय वाटेल तें केलें तरी मनाला समाधान लाभत नाहीं. प्रथमदर्शनी प्रेम

हें एक अनंत अविनाशी दिव्य, त्याची प्राप्ति हा चित्ताचा निदिध्यास, त्याची इष्टसिद्धि हें समाधान आणि त्यांतच ऐहिक जीवनाचा शेवट हेंच त्याचें उदात्त अंतिम ध्येय. प्रेमाचें ऊज्वल स्वरुप याहून अधिक निराळें काय असणार ?

प्रथमदर्शनी प्रेमानें बद्ध होणाऱ्या उभय जीवांच्या आत्म्यांतील दिव्याची उत्कटता हाच त्यांच्या दृष्टीमिलनानें निर्माण होणारा प्रीतिदिव्याचा साक्षात्कार; म्हणजे प्रेमाची उत्पत्ति हेंच दृष्टिमीलनानें घडणोंर कार्य. तेव्हां अर्थातच एकदां उत्पन्न झालेल्या प्रेमाची वाढ ही होणारच. तें निर्माण झालें त्या मूल स्वरूपांतच पुढेंहि रहावें अशी अपेक्षा बाळगणें, अनैसर्गिक आहे. बीजांकुरानें निर्माण झालेल्या प्रेमाचा विकास होऊं लागल्यावर उभयांच्याही अंतःकरणाला परस्परांच्या निकट सान्निध्याविषयींची प्रेमोत्कटता वाटूं लागावी हा निसर्गधर्म आहे; आणि त्या उत्कटतेचें रूपांतर अव्याहत साहचर्याची इच्छा बाळगण्यांत व्हावें हा त्या प्रीति-दिव्याचा उज्ज्वल प्रभाव आहे. दिव्यत्वाचा हा गुणधर्मच आहे कीं, त्याच्या सान्निध्याविषयींची आतुरता अनावर व्हावी. एवढेंच नव्हे तर त्यांत विरून जाण्याचाही मोह वाटावा. प्रथमदर्शनानंतर प्रेमाची उत्कटता वाढत जाऊन साहचर्याची हांव निर्माण होणारच आणि तशी निर्माण झाली म्हणजे विवाहाचे विचार मनांत येणारच; आणि त्यांना पुरेसा वाव मिळाला तर प्रीतिमीलनाची अधीरता अर्थातच वाढणार. पण तसा तो मिळाल्यावरही अगदीं अनपेक्षित संकटें निर्माण झालीं तर अशा वेळीं व्यवहार आणि भावना यांतील विपर्यस्तपणा लक्षांत घेऊन उच्छृंखल होऊं लागलेल्या भावनांना एकदम पायबंद घालून अंतःकरणाला पावित्र्याचे ओजस्वी पाठ शिकविले पाहिजेत. पूर्णावस्थेप्रत पोंचविलेल्या भावना एकदम बदलणें शक्य नाहीं, हें तितकेंच खरें, पण आत्मसंयमनाच्या वेदना सहन करून योगनिग्रह आचरला पाहिजे. हेंचं रहस्य ‘ मोगरा ’ काव्यांत वैशिष्ट्यानें दाखविलें आहे.

प्रथमदर्शनीं प्रेमाच्या दिव्यानेंच ‘ मोगरा ’ काव्याला सुरुवात झाली असल्यामुळें सुरवातीलाच परडी उधळून सांडलेलीं फुलें संबंध काव्यभर जागोजागीं विखुरलेलीं आहेत. पहिल्या दोन पाकळ्यांत दृष्टीमीलन आणि ह्यामुळें उभयतां आत्म्यांना मिळालेलें ‘स्वैर आंदोलन’ याचा आविष्कार आहे.

पहिल्या पाकळींत संविधानकाच्या मांडणीमुळें कांहीं ठिकाणीं वर्णन क्लिष्ट वाटत असलें, तरी पाकळीची सुरुवात आणि तिचा शेवट नितांतमधुर व हृदयंगम आहे. आणि सरलेच्या भावमुग्ध अंतःकरणांतील रमणीयता जागोजागीं फारच मार्मिकतेनें चितारलेली आहे.

मंद वायु जरि पदर उडेना तरिही सांवरिते
परडी हातांतली उगाची आंवळुनी धरिते

या ओळींतील भाव—सौन्दर्य अतीव सुंदर आहे. सरलेच्या भावमुग्ध अंतःकरणाचा परिपोष कवीला जितक्या मार्मिकतेनें साधला आहे तितकाच श्रीधरच्या स्वैर वृत्तींतील उच्छृंखलपणादेखील फारच खुबीनें वर्णिला आहे.

पुढें चालतो, मागें बघतो मधेंच थांबून
पुनः पुन्हा जणु घुटके घेतो अधीर होऊन

तिसऱ्या पाकळींत घडून आलेला वसंताच्या जीवावरचा प्रसंग प्रथमदृष्टिमीलनानें अनुभविलेल्या प्रेमाला अधिकच पोषक होतो. श्रीधरच्या धाडसामुळें वसंताचे प्राण वांचले, ही सर्वांची खात्री पटून तो सर्वांनाच प्राणाहून प्रिय वाटूं लागतो; आणि यामुळें श्रीधरचा सरलेच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेला जिव्हाळा सरला—श्रीधरांच्या अखंड साहचर्याला आणि प्रेम—वृद्धीला कारणीभूत होतो. उभयतांच्या निकट साहचर्यासाठीं घडवून आणलेला हा प्रसंग वस्तुस्थितीइतकाच सहजपणा निर्माण करितो.

चवथ्या पाकळींतील सरलेचा फुलाशीं चाललेला संवाद फारच मनोरंजक आणि भावोत्कट आहे. त्या संवादांत एकदा प्रेमानें, एकदा लाडीकपणानें, एकदां रागानें, एकदां उत्कंठेनें तर एकदा हट्टानें त्या फुलाला आळविण्यांत सरलेनें दाखविलेलें भावचातुर्य रमणीय आहे. कवीच्या स्वतंत्र प्रतिभेचा हा स्वैरविलास फारच हृदयंगम आहे. ठिकाठिकाणचीं सृष्टिशोभेचीं वर्णनें फार सुंदर आहेत. ‘ लावण्य ’ पाकळी पांचवी रसमधुर आहे. उभय जीवांच्या प्रीतिरहस्याला आलेलें उधाण अनावर आहे. तरुणांच्या अंतःकरणांतील रहस्यच फुटून कोठेंही ओसरतें, पण स्त्रीहृदयाचें व्याकुळ रहस्य तरुणाहून अधिक नाजुक असतें. स्त्रीहृदयाचें गुपित फार अगाध असतें. लज्जा, विनय आणि पावित्र्य यांच्या गांभीर्याखालीं स्त्रीहृदयाचा उतावळेपणा झांकला जातो. उद्यानांतील सौंदर्यशोभेचें वर्णन

फारच बहारीचें आहे. सरलेच्या स्वभावांतील उतावळेपणा कल्पनारम्य आहे. मोगऱ्यानें दिलेलें वाण कवि-कल्पनेचा रम्य विलास सुचवितें. प्रियकराच्या हृदयस्थ मूर्तीची मधुर चिंतनांत लागलेली समाधि श्रीधरच्या प्रत्यक्षच आकस्मिक येण्यानें आणि 'माळ कशी शोभे ?' या विनोदप्रचुर पृच्छेनें भंग पावते. आणि शृंगाराला रंग भरतो. या ठिकाणीं उभयांतील प्रेमाच्या पवित्र लपंडावाला सुरुवात झाली आहे. उभयांतील या निकट साहचर्या-मुळें व प्रणयलीलांमुळें त्यांच्या परस्पर संबंधाला प्रियाराधनाचें स्वरुप येऊं लागलें आणि म्हणून आतां आपला विवाह होणें फारसें शक्य नाहीं अशीच त्यांची भावना दृढ होऊं लागली. हे सर्व प्रकार इतक्या राजरोस-पणें घडत असतां नारायणरावाला याची दखल नसेल असें गृहित धरवत नाहीं. ही गोष्ट नारायणरावाला जरूर माहीत असली पाहिजे, पण यावेळीं त्याला त्यावद्दल एवढेसें वैषम्य वाटलें नसावें.

'परिमल' पाकळी सहावी मधुर आहे. श्रीधरच्या नष्टवैभवाची विषण्ण स्थिति फारच हृदयस्पर्शी आहे.

'अडकुन पक्षी पंख हालवी फडफडुनी सगळे'

या एकाच ओळींत श्रीधरच्या जळफळत्या जीवनाची मूर्त कल्पना उभी केली आहे. शरदृतूचें वर्णन नितांतसुंदर आणि चटका लावणारें आहे. एकाद्या अडाण्याला जरी तें वाचून दाखविलें तरी त्याला उत्कट आनंद होईल इतकें तें सहजसुंदर आहे. सरलेची विजयादशमी, औक्षणाची पूर्व-तयारी फारच खुमारीची आहे. प्रीतिपुष्पांचा प्रफुल्ल विकास ह्या थाटा-माटांत भरून राहिला आहे. औक्षणाचा प्रसंग, वसंताचा विनोद, श्रीधरचें गांभीर्य आणि सरला-हृदयाची उत्फुल्ल अवस्था यांच्या गोड संमिश्रणानें फारच रम्य मनोहर वाटतो. प्रीतिभक्तीची भेट अर्पण करतांना परस्परांना चुकून झालेला परस्परांचा स्पर्श उभयांच्या भावशृंगारांतील रम्य आविष्कार उकलून दाखवीत आहे.

पाकळी सातवी. आशेच्या स्वैर भरारीनें सरला श्रीधर भावी जीवनाचे मनोरे रचीत होते, तर इकडे नारायणराव मोठमोठीं स्थळें हातचीं जाऊं नयेत म्हणून चातुर्मास उलटण्यापूर्वीच लग्नाच्या बोलाचालींत गढून गेले होते. नारायणरावांचा रुबाब फार झोंकदार आहे, पण स्वभाव मात्र अतिशय हीन-

दर्जाचा आहे. आपल्या मुलाचे प्राण वांचविणारा श्रीधर त्याला निवळ सरले-वरील प्रेमाच्या कल्पनेमुळें वैऱ्यासारखा वाटू लागतो. तो नजरेसमोरही नसावा अशी त्यांची प्रवृत्ति होऊं लागते. केवळ ‘ पैशा ’ च्या अभावीं श्रीधर-सारखा अनुपम वर नारायणरावांचा जांवई व्हायला अपात्र ठरतो. कोण हीन दर्जा ?

लग्न नव्हे तें, विकली जावी हुंड्यावर काया

हेंच आमच्या समाजाचें ब्रीद. तरुण तरुणींच्या भावनांची जराही कदर न बाळगतां केवळ व्यावहारिक दिमाखासाटीं लग्नाचे ‘ फार्स ’ करण्यांत येतात. एका पैशाखेरीज दुसऱ्या कसल्याही बाजूचा विचार लग्नें घडवून आणतांना करण्यांत येत नाहीं.

नारायणराव सरलेसाटीं कृष्णपुरीचा दत्तक जहागीरदार वर म्हणून नियो-जित करितात, आणि आंदणासाठीं एक गांव इनाम, शिवाय हुंडा, करणी वगैरे सर्व देण्याघेण्याच्या अटींवरून सोइरसंबंध मुक्रर होतो. पण बिचाऱ्या सरलेला याची दखलही नसते. ती श्रीधरलाच देव मानून त्याच्या मधुरचिंतनांत भावी सुखाचे मांडे खाण्यांत गर्क असते. लग्न हें एक दिव्य आहे, पण त्याबद्दल समाजांत कोण बेफिकीरी दिसून येते, याचें वर्णन फारच सुंदर आहे.

विवाह म्हणजे जीवशिवाची जगतावर भेट

या ओळीवरून लग्नमांगल्याची महति पटते.

मधुस्राव. पाकळी आठवी. शरदश्रीच्या प्रफुल्ल वनसौंदर्याबरोबरच सरला श्रीधरांतील प्रीती, आशा—उत्कंठतेच्या मोहनमंजिऱ्यांनीं बहरूं लागते. उभय जीवांच्या प्रणयभावना अधिकाधिक आतुर होऊं लागतात; आणि आशावादी मन उंच उंच भराऱ्या घेऊं लागतें. अंतःकरणांत चैतन्याच्या गोड ललकाऱ्या उठूं लागतात व नसांनसांतून सुधामृताचे लोट वहात असल्याचा भास होऊं लागतो. पण अशा ऐन वेळीं कवि मधूनच सुच-वितो कीं,

हेतुसफलता नाहीं तोंवर धडपड ही सारी
भावनांतली गोड माधुरी चित्त पुढें सारी

हें तत्त्वज्ञान प्रणयी अंतःकरणांना पटणार नाहीं, पण विचारांना चालना

दिल्याखेरीज राहाणार नाहीं. शरद्दतूचें पहांटवर्णन अत्यंत गोड आहे. नर्कचतुर्दशीची प्रातःशोभा फार बहारीची आहे. भावनेंतील लालित्य आणि कल्पनेंतील ध्वनि हा तर मोगरा काव्यांतील विशेष आहे. मधुस्त्रावांतील वर्णन सबंध काव्यांत और आहे. मेजवानीचा थाट जिभल्या चाटायला लावणारा आहे. पक्वान्नांची रेलचेल आहे. सरलेची धांदल आणि वसंताचा विनोद यांनीं मेजवानीला रमणीयता आणली आहे. प्रथमदर्शनी प्रेम हा 'मोगरा' काव्याचा आत्मा असला तरी स्त्री--हृदयाचें नाजुक भाव--विष्करण, आणि अंतःकरणाचा परिपोष, हीं त्याचीं प्रधान अंगें होत. ही गोष्ट लक्षांत घेतली तर सरलेचा सहजरम्य अभिनय कवीनें ठिकठिकाणीं पुनरुक्तीनें पण विवक्षित पद्धतीनें कसा वर्णिला आहे हें मार्मिक रसिकांच्या ध्यानांत आल्याखेरीज राहाणार नाहीं.

दिवाळीचें प्रीतीभोजन आटपलें. आतां यापलीकडे प्रीतीच्या विलासाची आणिक काय पायरी शिल्लक राहिली ? पण भवितव्याची भीति माणसाला पदोपदीं नडत असते.

मूढ मनाला भविष्य—वार्ता उमजेना कांहीं
अनंत आशा डोकावति मग आशामय हृदयीं

सरला—श्रीधरांची हुबेहूब तीच अवस्था झाली. परस्परांवांचून परस्परांना करमेनासें झालें. पण आपणां उभयतांत अजून देवाची इच्छा उभी आहे, या कल्पनेनें त्यांची भवितव्याबद्दलची भीति वाढत जाऊन त्यांना निराश वाटूं लागलें. क्षणजीवी विरहाच्या क्षणभंगुर भावनांनीं श्रीधर वेडावून गेला. त्याला आज जगांत सरलेखेरीज दुसरें तिसरें कांहींएक दिसेना.

पंथ चालतां दिसला त्याला शालू तसलाच
सरला भासे दृष्टि बावरी होई तेथेंच
कीं सरलेची चाल चालते ललना अन्य, पथीं
सरला वाटुन शब्द घोळती अ[illegible]रि भ्रांती

ही हृदयस्पर्शी मनःस्थिति तर बहुतेकांच्या अनुभवाची असेल.

संध्यासमयाच्या सृष्टिसौंदर्याचें, अस्तोन्मुख दिवाकराच्या मावळत्या प्रकाशकिरणांचें, घरट्यांकडे धांवत सुटलेल्या भरारत्या पक्ष्यांचें, रंगमनोहर इंद्रधनूचें, म्लानवदन होउं लागलेल्या कमल—पुष्पांचें, देहभान विसरून

कमलांतल्या गंधमोहन परागांतच गुरफटून राहिलेल्या मधुपांचें, वनवेलींचें, पानफुलांचें वर्णन फारच सुंदर आहे. शब्दगौरव वाखाणण्यासारखे आहेत. लतामंडपांत बसलेल्या सरलेचें स्थितिचित्र फारच नाजुक शब्दांत वर्णिलें आहे. मोगरवेलीवरील तिच्या उत्कट प्रेमाला पुन्हा या ठिकाणीं विपुल बहार आला आहे. त्या मोगरवेलीचीं सुमन-मौक्तिकें वेंचून ती पुन्हा पर्युत्सुक अंतःकरणानें लताकुंजांत जाऊन बसली. केस पाठीवर रुळत होते, अंतःकरणांत प्रीतीचे मंजु भाव निनादत होते, गात्रांगात्रांतून आशेचा सुधावर्षाव होत होता, अचल दृष्टी मोगऱ्यावरली प्रभासौंदर्य लुटीत होती, आणि अंतःदृष्टी श्रीधरचें स्मृतिचित्र डोळ्यासमोर उभें करून प्रीतिपुष्पांनीं पूजा बांधीत होती. सरलेच्या या बेभान अवस्थेचें वर्णन अत्यंत सुंदर आहे. प्रीतीच्या मधुर चिंतनांत–दिव्यप्रेमाच्या गोड तंद्रींत–तिच्या सगळ्या भाववृत्ति विरून गेल्या.

वृत्ति हारली, तोंच झांकले नयन तिचे कोणीं
येउं नये बाहेर झांकलें मोत्याचें पाणी

मोगऱ्यांतील नितांत मधुर शृंगारविलासाची ही परिसीमा आहे. श्रीधरच्या प्रणयभावनांचें हें अत्युत्कट उदात्त स्वरूप आहे. डोळेझांकीचा हा प्रसंग रसिक अंतःकरणांना प्रीतिशृंगाराच्या प्रफुल्ल विलासानें भुरळ पाडणारा आहे.

नुसत्या कल्पनेच्या वातावरणांत सरला-श्रीधरांच्या प्रीतीला आज परस्परांच्या हृदयवल्लकीवर मंजुझंकार छेडायला सांपडले. भावनांच्या अंतरिक्षांत उफाळणाऱ्या उभयतांच्या उत्कंठांना आजच्या प्रेमाच्या परब्रह्मस्वरूपाचा आत्मसाक्षात्कार लाभला. पण हाय ! त्याची परिसीमा इतकीच होती. दृष्टिमीलनाच्या दिव्यतेंत निर्माण झालेल्या प्रीतिदिव्याची सौख्यसीमा इतकीच होती. आणि पुढें कारुण्याचा अनंत व्यामोह पसरला होता. सरला श्रीधरांतील हें प्रीतिदिव्य पार्थिवाच्या मृण्मय स्पर्शानें काळवंडून न जातां अधिक तेजस्वी झालें. आणि त्यानें त्या उभयतांच्या पार्थीव-मीलनाचा धिक्कार केला. या दैवी कोपाच्या आधारानें नारायणरावांची हौस काव्यांत उभी राहिली; आणि सरलाश्रीधरांच्या मीलनांत दैवाची खडतर इच्छा येऊन पडली. सरलेची प्रीति–दौलत निसर्गानें लुटून

घेऊं नये, तिच्यांतलें जडजवाहीर ओसंडून जाऊं नये, म्हणून बिचाऱ्या श्रीधरनें तिचे डोळे झांकून घेतले. पण हाय! यामुळें केवढी भयंकर आपत्ति ओढवली. प्रीतिदिव्याच्या संरक्षणाची ही अधिरता श्रीधरच्या आंगलट येऊन परस्परांच्या सुखस्पर्शानें उभयांतील प्रीतिदिव्याचा ब्रह्मानंद आज पार मावळला आणि कारुण्याचा कहर उभयांच्या सौख्यविनाशाला कारणीभूत झाला. पुन्हा म्हणून सरलेच्या स्मित कटाक्षांचा दिव्यानंद श्रीधरला अनुभवायला मिळाला नाहीं; आणि सरलेलाही श्रीधरच्या प्रेमदृष्टींतील भावसुख लाभलें नाहीं.

प्रथम दृष्टी—मीलनापासून वाढत गेलेली प्रीतीची उत्कंठा 'मधुस्त्रावांत' डोळेझांकीच्या श्रृंगाररम्य विलासानें उत्कट झाली, आणि येथून पुढें श्रृंगाराला ओहोटी लागली; व कारुण्याला भरतें येऊं लागलें. वसंताची म्लान चर्या श्रीधरच्या अस्वास्थ्याला कारण झाली, आणि—

पुन्हा पण असा दिसेल कां मज होरा परतून ?

या दुःखोद्गारांनीं नारायणरावांचा निष्ठुर निश्चय ध्वनित केला. सकाळीं प्रीतिभोजनाचा प्रसंग घडल्यानंतर संध्याकाळपर्यंत वसंताच्या इच्छा-अपेक्षा पार विरून जाऊन तो अश्रु गाळण्याइतका निराश होतो, याचें मोठें आश्चर्य वाटतें, पण नारायणरावांनीं लपवून ठेवलेली हकीगत कशामुळें तरी उघडकीला येऊन वसंताला कळली असावी, असा अंदाज दिसतो. पण एवढी गोष्ट खरी कीं, लग्नाची वाटाघांट सरलाश्रीधरांना कळवूं नये, निदान लवकर तरी कळूं नये, अशी नारायणरावांनीं खबरदारी घेतली असावी; इत्यर्थ, कारण कांहीं कां असेना पण आतां मोगऱ्यांतील आनंदाचे झोत वाहून गेले, आणि कारुण्याचे झंझावात घोंघावूं लागले. प्रफुल्ल बहरानें उमललेला 'मोगरा' येथून पुढें कोमेजूं लागला; आणि त्याच्या पाकळ्यांवर वायूंत विरलेल्या दिव्याचे दंवबिंदु टपकूं लागले. वर्मीं घाव बसलेला 'मोगरा' कालकोपानें शेवटीं विशीर्ण झाला, पण त्याच्यावर टपकलेल्या दंवबिंदूच्या शीतल तेजानें त्यांत विश्वरहस्याचें 'दिव्यत्व' निर्माण झालें. आशेच्या गोड ललकाऱ्या वातावरणांत विरून गेल्या व विशीर्णतेचे करुण हुंकार काव्यांत उठूं लागले. आठव्या पाकळीपर्यंत विपुल बहारानें फुललेला निसर्ग आतां नवव्या पाकळीपासून करपूं लागला. रसवंतीचे मंजुल आलाप आतां भेसूर येऊं लागले.

नव्या लतेची नूतन कलिका खुलली नाजूक
चुरगळली, मातीस मिळाली, विरली मातींत

या दोनच ओळींत सरलेच्या जीवनाचा आटोप होऊं लागला. हाय ! एक पैसा एवढा भयंकर विपर्यास करूं शकला. पैसा–पैसा–पैसा. कोण जहरी चीज ! अरेरे !

पैसा जीवन, जगतीं मोहन–मंत्र एक पैसा
आणि त्या पैशावर उभी राहिली सरलेची काया

काय हें पैशाचें विराटस्वरूप !

पैशाची घमेंड, पैशाची रग, पैशाची धुंद अशीच बेदरकार असते. तिला स्वतःच्या बडेजावापलीकडे इतरांच्या सुखाची कधींच पर्वा वाटत नाहीं; व म्हणून भावनाप्रधान जीवांना अशा स्वार्थी जगांत सुखानें जगण्याचा अधिकार नसतो. त्यांचें जीवन निवळ जंजाळवाणें असतें.

भाऊबीज आली. बहीणभावांतील कोण सुखसोहळ्याचा दिवस ! पण वसंत आणि सरला यांना आजची बीज कल्पनारम्य जीवनसौख्यावर तिलांजलि वाहणारी वाटली. दोघांच्याही नेत्रांतून अश्रूंची धार खंडत नव्हती. निराश विचारांच्या विपण्ण काहूरांनीं सरलेचा ऊर दडपून गेला. आई, बाप कुणाचे नाहींत, जो तो आपल्या स्वार्थासाठींच आहे, हें भीषण रहस्य तिच्या लक्ष्यांत येऊन चुकलें. आपलें अंतःकरणच आपल्याला जें सुख देईल तेंच खरें सुख; बाकीच्या लटक्या गोष्टी होत, हें तिला पटलें. ती उठली आणि ज्यावेळीं जगांतले बहीणभाऊ औक्षणाचा आनंद लुटण्यांत गर्क झाले होते, त्या वेळीं ती आपल्या मोगरवेलीजवळ गेली, आणि तिनें तिला आपल्या करुणाश्रूंनीं मनसोक्त न्हाऊं घातलें; आणि अंतःकरणाची तीव्र वेदना, जीवाची व्याकुळ तळमळ शांत होईपर्यंत आपल्या प्रीति-रहस्याचा विलाप तिच्याजवळ ओकून टाकला; आणि मोठ्या बाणेदारपणानें

‘ नको मला सम्राट जरी तो देव स्वर्गींचा
वाचस्पति जरि सरस्वतीचा, कुबेर लक्ष्मीचा
प्रीतिसाक्ष तूं हृदयसाक्ष तूं साक्ष तुझी देवा
दिला एकदा हृद्भावांचा सुखकारी टेवा ’

आपलें हृद्गत ओकून टाकलें.

सरलेचा विलाप संपला. तिच्या मनावरील पार्थीवसंस्कार आतां साफ पुसटुन निघाले. मानवी विकार जळून खांक झाले आणि घांटावर सांडलेल्या फुलांचा दिव्य परिमल आज तिच्या अंतःकरणांत दरवळूं लागला. तिच्या अंतःकरणांत कसला तरी लख्ख प्रकाश पडला आणि

प्रीतिभक्तिची नजर तुझी ही व्हावी साक्षीची

असे उद्गार तोंडांतून बाहेर पडले; आणि ती मोगऱ्याचीं फुलें वेंचू लागली. तोंच वसंत तेथें आला. पुन्हा सरलेच्या मनाची चलबिचल झाल्यासारखी वाटली, पण ती क्षणिक होती. लागलींच दिव्य लकेरींचे पडसाद तेथें घुमूं लागले.

भगिनी सरला श्रीधरची ती भगिनी विश्वाची

देवाच्छादनांतील संध्यासमयाचें वर्णन अतीव मधुर आहे.

'विशीर्णता' पाकळी १०. सरला तर आतां दिव्यस्वरुप झाली, पण श्रीधर अजून पार्थीवाच्या जंजाळांतच कुचंबत होता; पण तो आज एकाकी होता. वसंत आपल्या निराशेंत चूर. सरलेची तर विदेहावस्था झाली; आणि श्रीधर स्वतःच्या दुःखवेदना सहन करायला एकटाच उरला. कोणी येऊन समाधानाचे शब्द सांगेल अशी आशाच उरली नाहीं.

कोण जिवाचा पंचीप्यारा, हृदया झुलवील ?

हा एकच हुंकार कानठळ्या बसवूं लागला. रात्र पडूं लागली. किड्यांची 'किर्र' 'किर्र' रातबोली सुरू झाली. भालू ओरडूं लागले, आणि दिवाभीतांचे भीषण घूत्कार विश्वाचें हृदय हालवूं लागले. हाय ! हाय !! श्रीधरची कोण भयंकर अवस्था झाली ! त्याचें भंगलेलें रहस्य त्याचा जीव फाडून खाऊं लागलें. तो असहाय चित्तानें विव्हळूं लागला, व त्याच्या मनांत एकच एक कल्पना नाचूं लागली; तो उठला. ज्या दिव्य समाधीनें त्याच्या जीवनांत हें दिव्य निर्माण केलें होतें, ज्या मंगल समाधीनें प्रथमदर्शनीं प्रेमाची मध्यस्थी केली होती, त्याच समाधीकडे आपल्या जीवनरहस्याची दादपुकार लावून घेण्याकरितां निघाला व तिच्यासमोर उभा राहून तळमळत्या अंतःकरणानें करुण किंकाळी फोडली—

'नाहीं मीलन कां खरोखर पुढें अंतीं निराशाच कां ?' ह्या एकाच ओळींत श्रीधरचा सर्व विलाप सांठविला आहे. या एकाच हुंदक्यानें

श्रीधरनें समाधि गद्‌गदा हालविली. पण हाय ! त्या समाधीला पाझर फुटला नाहीं. जी दिव्य समाधि अंतःकरणाच्या तीव्र वेदना शांत करून घेण्याचें विश्रांतिस्थान वाटत होती, ती समाधि आज श्रीधरला निष्ठुर वाटूं लागली. आणि म्हणून शोकावेगांत त्यानें पुढील हृदयस्पर्शी उद्गार काढले.

दिव्याची प्रतिभा समाधि जगतीं ही दावितें मंगलें
प्रीतीसाक्ष म्हणून भक्ति भरुनी ही पूजिली प्रेमलें
दैवाघात कधीं फिरूं न शकतो, दिव्यांतही शक्ति ना !
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !

'विशीर्णतेंतील' विरहतरंग शोकोन्मादानें डोळ्यांत अश्रु उभे करतील. अश्रूंच्या मनमुराद वर्षावानंतर नुसत्याच करुण निश्वासांचे प्रलयवात घोंघावूं लागतात.

मोगऱ्यांतील 'दिव्यत्व' हा बन्सीधरांच्या रसवंतींतील जिवंत काव्याचा नमुना आहे. दिव्यत्वांतील सुरुवातीचा एकेक शब्द अंतःकरणांत जाऊन भिडतो.

विलाप संपला, शब्द थांबले, पण अजून हुंदके थांबेनात, अंतःकरणांत जोराची हुडहुडी भरूं लागली, जीव गुदमरूं लागला, आणि सगळा धीर खचून गेला. तोंच कसलीशी काळी छाया त्याला हाललेली दिसली. आणि त्याला अधिकच निराशा वाटूं लागली; पण ती सरला आहे असें कळल्यावर तो पुन्हा चालू पदावर आला व त्याचे विकार उफाळले. मात्र सरलेनें असें कांहीं झणझणीत अंजन त्याला घातलें कीं, प्रेमाच्या रम्य प्रसंगांनीं फुललेला मोगरा जळजळीत 'विशीर्णतेनंतर' 'दिव्यत्वांत' समाविष्ट झाला. सरलेनें प्रीतिदिव्याची महति ऊर्जस्वल वाणीनें श्रीधरला पटवून दिली. परमेश्वर कोठें आहे हें जसें सांगतां येत नाहीं, आणि कोठें नाहीं हेंही सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच प्रीति कोठें व कशी आहे याचेंही उत्तर देतां येत नाहीं. अतएव प्रीति म्हणजेच परमेश्वराचें अनंत दिव्य स्वरुप अशी सरलेनें श्रीधरची समजूत घातली; हस्तांदोलन, चुंबन व आलिंगन हीं प्रीतीमीलनाचीं साधनें नसून पार्थीवाचे उपभोग आहेत. पार्थीवाचा त्याग हेंच प्रेमाचें प्रयोजन. निकट साहचर्याची उत्कंठा आणि पार्थीव संयोगाचा अभिलाष या दोन भिन्न गोष्टी आहेत. सरलाश्रीधरां-

तील गुपित असेंच दिव्य होतें. पण व्यवहारांतील यातायात पदोपदीं त्यांना नडल्यामुळें त्या प्रीतीदिव्याचा उलगडा त्यांना झाला नाहीं. पण आज

प्रेमालिंगन गुपित उकललें तिथेंच हृदयाचें
शिरें नमविलीं समाधिवरतीं वंदन दिव्याचें
अलकग्रंथितुन तोंच निघालीं सुमनें प्रीतीचीं
प्रीतिभक्तिची नजर श्रीधरा सरला भगिनीची

हा काव्यविलास नितांत सुंदर आहे. प्रीतीचें दिव्य तें हेंच. म्हणूनच 'प्रेमालिंगन गुपित उकललें तिथेंच हृदयाचें' प्रेमालिंगन गौप्य होतें, म्हणून त्यांना आजवर उकललें नाहीं. पण ज्या दोन जीवांत तें पतिपत्नी या नात्यानें घडलें असतें, त्याच दोन जीवांत तें बंधुभगिनी या नात्यानें घडलें. त्यांतील प्रीती उज्वल नाहीं असें कोण म्हणेल? उच्च संस्कृतीच्या दोन अंतःकरणांत हा काव्यविलास कवीनें घडवून आणला आहे. ज्यांची संस्कृति पवित्र आणि ओजस्वी असते, त्यांनाच हे दिव्याचे संस्कार लवकर पटतात. आणि त्यांत नवल असें कांहींच नाहीं; नवल आहे तें नवल पाहाणारांच्या मनोमालिन्याचेंच.

निराशा एकदा निश्चित ठरल्यावर अत्याचारी वृत्तीनें पुढें धांव घेण्यांत काय हंशील आहे? मग अशा वेळीं निराशेनें दग्ध होऊं पाहणाऱ्या भावनांना जर चांगलें वळण देण्याचे परिश्रम घेतले, तर वावगें असें कांहींच नाहीं, आणि म्हणून श्रीधरनें सरलेला तोंड भरून 'ताई!' अशी हांक मारली व तिनेंही तितक्याच प्रेमानें 'दादा!' म्हणून त्याच्या प्रेमाची परतभेट दिली. तर त्यांत अनैसर्गिक असें कांहींच नाहीं.

प्रथमदर्शनीं प्रेमाचा हा शेवट अर्थातच वैवाहिक जीवनापेक्षां अधिक ऊज्वल आहे, यांत शंका नाहीं. मात्र याचा अर्थ असा नाहीं कीं, प्रथमदर्शनी प्रेमाचा शेवट विवाहांत होऊं नये. तो तसाच व्हायला पाहिजे, पण जेथें समाजस्थितीचीं बंधनें आडवीं येतील तेथें हाच मार्ग पत्करणें भाग आहे. भावना आणि व्यवहार यांतला भेद फार नाजुक असल्यामुळें त्याचा येथेंच पूर्णविराम केलेला बरा.

'मोगरा' काव्याविषयीं श्री. बन्सीधरांबरोबर चर्चा करितांना काव्यांत मला आढळून आलेल्या मात्राभंगाबद्दल त्यांनीं असा खुलासा केला कीं,

सहजसाध्य अर्थहानि करण्यापेक्षां क्वचित् ठिकाणीं असलेला छंदोभंग तसाच ठेवणें अधिक श्रेयस्कर आहे; आणि कुणालाही ही गोष्ट पसंत पडल्याशिवाय राहाणार नाहीं. कारण, खरा रसिक गण, मात्रा, यमक यांत न गुरफटतां काव्याच्या मूळ भावनांत तल्लीन होतो. असो.

विद्या-विहारमंडळाचे चिटणीस श्री. रा. ना. नाईक यांनीं परिचय लिहून देण्याविषयीं सूचना केल्याबद्दल व श्री. वन्सीधर यांनीं वेळोवेळीं सदर काव्यावर मला चर्चा करूं दिली व माझ्या शंकांचें निरसन केलें, याबद्दल त्या दोघांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

**म. रा. उपासनी,**
देशमुखांचा वाडा धुळें,
विजयादशमी १८५१

कृष्ण.



श्री. राजाराम नारायण शहा.

पो. चहार्डी. पू. खा.

# आभारी आहोंत !

बन्सीधरांचे आभार मानावयासच नकोत. कारण बन्सीधर मंडळाचेच ! आत्मस्तुतींत अर्थ काय? त्याचप्रमाणें '**बन्सीधर व मोगरा**' या मथळ्याखालीं चार शब्द लिहिणारे **श्री. कृष्ण** (म. रा. उपासनी.) यांचे आभार काय म्हणून मानावेत ? मंडळाच्या चिटणिसापेक्षांही मंडळाबद्दल अभिमान बाळगून मंडळाची अव्याहत सेवा करणारे श्री. '**कृष्ण**' हे मंडळाचे सन्मान्य सदस्य आहेत. मंडळ तर अशा सदस्याचे सदैव ऋणी आहेच आहे.

पण मंडळाच्या आकांक्षा ज्यांच्या द्रव्यसहाय्याशिवाय ठिकच्याठिकाणीं जिरल्या असत्या, त्या श्रीमंत **राजाराम नारायण शहा** चहार्डीकर यांचे नुसते आभार मानूनच मोकळें होतां येणार नाहीं. कारण त्यांचा हात फार अडचणींत असतांही मंडळाबद्दल आपलेपणा दाखवून व मंडळाच्या विनंतीला मान देऊन त्यांनीं 'मोगरा' प्रकाशनाकरितां द्रव्याचें सहाय्य केलें त्याबद्दल मंडळ त्यांचें अखंड ऋणीच राहील.

त्याचप्रमाणें श्री० **क. म. सोनाळकर**—जळगांव ऊर्फ आप्पासाहेब यांनीं **रहस्या**चा उकल केल्याबद्दल त्यांचे व बन्सीधरांचे पूज्यपाद गुरु ती. काकासाहेब ऊर्फ **अनंत कृष्ण नूलकर** यांच्या प्रेमळ साहाय्याबद्दल त्यांचे कोणत्या शब्दांत आभार मानावेत, हेंच कळत नाहीं.

आणि ज्यांनीं थोडा हलगर्जीपणा केला असता तर रसिक जरा 'खट्टू' झाले असते, त्या **श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स पुणें**, यांच्या सेक्रेटरींचे त्यांनीं काळजीपूर्वक केलेल्या पुस्तकाच्या छपाईबद्दल मंडळ आभारी आहे.

चिटणीस,

**विद्या—विहार मंडळ.**

# अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| रहस्य, आभार वगैरे— | | | पानें. |
| पाकळी १ ली. | कलिका. | .... .... | १–११ |
| पाकळी २ री. | स्वैर आंदोलन. | .... .... | १२–१५ |
| पाकळी ३ री. | मुग्धावस्था. | .... .... | १६–२० |
| पाकळी ४ थी. | विकास. | .... .... | २१–२५ |
| पाकळी ५ वी. | लावण्य. | .... .... | २६–३० |
| पाकळी ६ वी. | परिमल. | .... .... | ३१–३५ |
| पाकळी ७ वी. | भ्रमरगुंजन. | .... .... | ३६–३८ |
| पाकळी ८ वी. | मधुस्राव. | .... .... | ३९–४५ |
| पाकळी ९ वी. | दंवाच्छादन. | .... .... | ४६–५० |
| पाकळी १० वी. | विशीर्णता. | .... .... | ५१–५८ |
| पाकळी ११ वी. | दिव्यत्व. | .... .... | ५९–६३ |

# शुद्धता.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| १ | ११ | कंठीचा | कंठिंचा |
| २ | २२ | माना लवती | लववितिं माना |
| २ | २८ | हंसरी | करडी |
| ५ | २४ | कुसुमांची | भावांची |
| ८ | १२ | वेलच त्याला | मोगराच त्या |
| ८ | १३ | तयामधिं | जयामधिं |
| ९ | १४ | तिमिराची | पुनवेची |
| १० | २४ | मंदरिस्मत | मंदस्मित |
| २२ | १ | गळनी | गळुनी |
| २३ | १५ | होऊं | होउं |
| २५ | १६ | हतभा | हतभागी |
| २८ | ६ | साघी | साधी |
| ३१ | २४ | काराया | कराया |
| ३८ | ४ | उज्वल | ऊज्वल |
| ४० | १८ | झेंडा | झेंडा |
| ४१ | २ | घालिला | घातला |
| ४१ | ८ | भर्र | भरी |
| ४३ | १६ | ह्या | त्या |
| ४४ | २५ | होते | होतें |
| ४७ | २७ | झालो | झाला |
| ४८ | २८ | दुदवाचा | दुर्दैवाचा |
| ५० | १ | होऊं | होउं |
| ५० | १४ | बाहिली | पहिली |
| ५२ | ७ | जळालें | जळाले |
| ५२ | ११ | चिंतामध्यें | चित्तामध्यें |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | १३ | नाजूक | नाजुक |
| ५२ | २५ | येईल | येइल |
| ५३ | २७ | तरुवरी | तरूवरी |
| ५३ | २७ | मी | मीं |
| ५३ | २८ | वघे | बघे |
| ५५ | ९ | हृब्दाग | हृद्बाग |
| ५५ | १२ | अंनीं | अंतीं |
| ५५ | २८ | का | कां |
| ५६ | २५ | निधळून | निथळून |
| ५८ | ९ | निराशाच | निराशा |
| ६० | ४ | शूर | सूर |
| ६० | २६ | हलहलुनी | हळहलुनी |

# भावसुमनें

जिच्या प्रेमळ साहचर्यानें बन्सीधर नव्या जन्माचा
अधिकारी झाला, व जिच्या पवित्र आणि
ऊर्जस्वल उपदेशानें बन्सीधराच्या
हृदयांत प्रीति-दिव्याची सुंदर
बाग फुलली
त्या

## दिवंगत मातेस

बन्सीधराच्या
बागेंतील पहिल्या
भावसुमनांची ओंजळ जमीन-
अस्मानचें अंतर असतांनादेखील भावनेच्या
जोरावर बन्सीधराची ही पाद्यपूजा पोंचती करील ना

बलीप्रतिपदा शके १८५१ बन्सीधर.

पुणें.

# मोगरा.

परडी पडली, फुलें सांडलीं घांटावर सगळीं

## पाकळी १ ली.

### कलिका.

ग्रंथसंग्रहालय
नं. ३९५१

संध्यासमयीं नील नभावर सुंदरशी छाया
मेघ घालिती; जणों झांकिती नाजुकशी काया
संध्या राणी रवि बाळाला पश्चिम देवीच्या
पाळण्यांत सोन्याच्या निजवी नादीं गीतांच्या
'जों जों बाळा नीज !' म्हणोनी ओव्यांचीं गाणीं
गाउनि, वारंवार करांनीं घे कुरवाळूनी
" श्रमला माझा बाळ पश्चिमे ! सांभाळीं याला
सदा पाहुनी दृष्ट लागते म्हणुनी झांकियला
राजस रावा प्यार दिलाचा सांभाळीं नीट
हार कंठीचा, साज जिवाचा मानुं नको वीट
मेघांनो ! थांबवा जराशी गडबड ही सारी
निजला न सखा तुमचा अजुनी, श्रमलासे भारी "
म्हणून सारे मेघ दाटले आकाशीं भरुनी
रविराजाला निजवायाला पट अवघड करुनी
वनांतले गोपाल धांवती गाईंच्या मागें
वळवायाला, गेल्या होत्या कळपांच्या संगें
ऐकुनि आरोळी प्रेमाची टवकारुनि कान
हंबरून पाहती तयांना वांकवून मान
दुसऱ्या हांकेसरशी येती धांवुनि सर्व जणी
कृष्णाची बांसरी ऐकुनी गोपी याव्या झणीं

खिल्लारांची गर्दी झाली रस्त्यांतुन सारी
घंटा ‘ किण किण ’ मधुन वाजती कर्णमनोहारी
कुणी धांवती उभारुनी तें पुच्छ बांकदार
कुणी चालती लगबग, करुनी मान ऐटदार
कुणी चालती गोपालाच्या जवळीं अगदींच
जणु न साहवे मुळींच त्यांना विरहाची आंच
विहंग सारे जमुनी वृक्षीं मंगल गीतांनीं
सुंदर कवनीं स्तविती ईशा, सुरेल तानांनीं

माळव्यांतलीं सुंदर शहरें अफाट वस्तीचीं
इतिहासाचीं गाणीं गाती ऊज्वल कीर्तीचीं
झालीं तुंबळ युद्धें; पडले प्रेतांचे ढीग
रिपु–रुधिराचे पाट वाहिले; मांसाचे ढीग
तरवारीचे नाच चालती, रक्ताचे ओघ
घोड्यांच्या टापांनीं व्हावी भूहि जिथें भंग
भाल्यांच्या टोंकांवर चमके स्वाभिमान शुद्ध
चिरेबंद किल्ल्यांत टाकतां नजर होत गुंग
किल्ल्याच्या बुरुजावर चमके निशाण तेजस्वी
शशिसूर्यांचे किरण वर्षुनी आशीर्वच दावी
इतिहासाचीं पानें भरलीं ज्यांच्या गुण–गानें
इतिहासाची उत्पत्ती पण त्यांच्या शौर्यानें
माळव्यांत त्या रामपुऱ्याचा सुभा असे मान्य
माना लवती ज्याच्यापुढतीं शूर बहू मान्य
एका शब्दावरी नाचवी जो सारी सेना
एका पगडीवरी हालवी, चतुर जसा राणा
आज कुठें ती त्याची सेना, कुठें सुभा राही
कुठें तयाचें वैभव, कोठें आतां कांहीं नाहीं
कालाच्या फेऱ्यांत सांपडे वसुधा ही सारी
चंचल जिकडे तिकडे हंसरी कालाची नजरी

कुणा हांसवी, रडवी कोणा, कुणास छळवादी
कुणा दाखवी आशेचे पण निराश दिन आधीं
कुणा बुडवितो, कुणा तुडवितो, कुणास कांपीतो
हृदय–विणेवर कुठेंच तारा नश्वर छेडीतो
क्षणांत इकडे, क्षणांत तिकडे, भरला चांचल्यानें
अतर्क्य काला कोण वर्णितो अपुल्या वाणीनें ?
वंश लयाला जाउं नये हा देवाचा हेत
वंश–बीज राहिला, जाहली दैवावर मात
रामपुऱ्याचा वंश आजला श्रीधर हा एक
रमले ज्याचे पूर्वज समरीं न कळति कित्येक
पिता तयाचा बाळपणांतच मृत्यूनें गिळिला
मातेनें पण लगेच त्याचा पंथ आक्रमीला
भगिनी बंधू यांच्या संगें रमला स्वच्छंद
सर्व चिरडलें कालानें परि कराल दाढेंत
श्रीधर आतां बाळ पोरका रामपुरीं राही
परंतु परमेशानें दिधली मानाया आई
वत्सलता मातेची असते कांहिं तरी न्यारी
दुनिया मारी प्रीत–भरारी, परंतु ती भारी
प्रेमाचा वाहतो झरा तो अखंड जन्मवरी
झरे आटती पाण्याचे ते क्षणैक सुखकारी
मेघ फांकती, नद्या आटती, सागरही गोठती
मातेच्या हृदयींचे सागर अगाध पैं असती
त्या मातेच्या प्रेम-दृष्टिला श्रीधर अंतरला
मानिव माता गिरिजा रक्षी प्रेमें श्रीधरला
श्रीधर बालक गिरिजेचा, ती माता पण त्याची
सौख्याकरितां त्याच्या अपुलें आयु सदा वेंची
श्रीधर जीवाचाहि तियेचा जीव असे प्यारा
सर्वस्वाचीं फुलें वेंचिलीं, तोच तिचा थारा
दिसलें त्याचें वदन जरासें झालेलें म्लान

उडे तिच्या हृदयांतील सारें सौख्याचें स्थान
जरा लागलें भाल तयाचें झालेलें ऊन
तिज वाटावें उदासवाणें सर्व विश्व खिन्न
श्रीधर पण कधिं विसंबला नच तिजवांचुनं अन्य
कधीं नाठवे, मानुनि राही त्रिखंडांत धन्य.
न दिसे गिरिजा नयनांना तर व्याकुल मनिं होई
धांवा करि नित ‘ देवा माता ही तरि मज ठेवीं; ’
जरि न ऐकले शब्द तियेचे प्रेमळ, कानांनीं
अश्रु--जलाच्या धारा स्त्रवती अखंड तन्नयनीं
सुत--मातांच्या प्रेमैक्याची झुळझुळती गंगा
प्रेम--सुधेचे तुषार उडवी नानाविध रंगा
हें न पाहवे काळाला त्या जहरी नेत्रांनीं
सहज फिरविली नजर विषारी हास्य विकट करुनी
कर काळाचा कुणि काढिल कां गळ्यांत अडकविला
पाश तयाचा कोण झुगारी सोडिल कां त्याला ?
सहज फेकिल्या दृष्टि-क्षेपें देह विकल झाला
सुख--दुःखांच्या युग्मांमध्यें कालाचा घाला
वीज कडाडुनि कोसळली जणु श्रीधरच्या हृदयीं
छिन्नविच्छिन्न करी, तदा तो विव्हळ बहु होई
आकाशाची कुऱ्हाड घाली अंतःकरणीं घाव
मुळीं देइना विचार करण्या क्षणभरसा वाव
भूमी झाली भंग, तियेला कोण हात देई ?
हृदयाच्या हळुवारपणाचा ठाव घेत जाई.

ज्या स्तंभावर उभारली ती श्रीधरची छाया
नष्ट जाहली, प्रखर उन्हानें धगधगली काया
मातेचा कर जगतीं नसतां कुठली ये माया
उदासवाणी सृष्टी दावी कालाची माया
ज्या आधारीं जगला, गिळुनी दुःखांचे भार

सुटला तो मग जिकडे तिकडे सर्वच अंधार
विषण्ण झाली अवनी, वाटे खिन्न दिशा दाही
प्रभाकराच्या किरणांतुन पण विषण्णता वाही
विश्व–सागरीं सुटली नौका जीवाची भव्य
काल–वायुनें झोला दिधला करावया दिव्य
श्रीधरचें मन बांधित होतें उंच मनोरे कांहीं
आतां थोरी त्यांची एका आईविण नाहीं.
प्रभात होई, अरुण हांसवी अवनीला खुद्‌करी
वृक्ष डोलती, भ्रमर गुंगती, विहंग गाती जरी
मोर नाचती, फुलें उमलतीं, निर्झर स्त्रवती जरी
दिशा धुंदती, मेघ रंगती, तारा चमके जरी
तरी श्रीधरा कळे न कांहीं विश्व काय दावितें,
हृत्पटलावर चित्र कशाचें कैसें मग उठतें ?
मुळीं कळेना कसला वारा मनांत हा वाही !
चित्त चिंतितें विचार कसला उमजतही नाहीं.
नैराश्याचे दिन हे जाती एकामागुन एक
चक्राचे जैं फेरे फिरती नकळत कित्येक

तोंच अंबरीं एके दिवशीं मेघ गडाडुनि येती
चातक पक्षी आनंदानें ललकाऱ्या घेती
खडकावरतीं सुंदर उगवे जणू आंबराई
दगडावरतीं मधून चमके सुंदरशी जाई
श्रीधर–हृदयीं तसेच आले आशेचे मेघ
जीव चातकापरी पहातो सुंदर जल-ओघ
आशामय कुसुमांची उसळे गर्दी एकसरा
किल्ल्यावरतीं किल्ले बांधी मानस भराभरा
कोण वर्षितो वरून साजुक सुमनांची माला ?
कुणीं गुंफिला हृदयावर नव सुंदरसा झेला ?
कुणीं घातला मंत्र जादुचा फुंक मारुनी कानीं ?

दुःखांनीं भाजल्या शरीरा कोण जलें न्हाणी ?
कुणीं घातलें शुष्क लतेला अमृतसें पाणी ?
कोण शांतवी सतप्त हृदया गाउनियां गाणीं ?

पश्चिम भागीं सुंदर वाडा विलसे ऐटींत
जहागिरीच्या अभिमानानें डोले झोंकांत
एकावरतीं उभारलेले मजले ते तीन
ऐश्वर्याची शोभा दावी उतरे सोपान
चहुं बाजूंला बुरुज बांधले जणू शिलेदार
लक्ष्मीच्या रक्षणीं दंगले मावळचे वीर
चहूं बाजुंला कोट बांधला भिंतींना चार
नव्या दमाचीं सैन्यें व्हावीं जेथें लाचार
भक्कम दरवाजाला होते लंगरचे दांत
टक्कर देतां हटतिल मागें हत्ती उन्मत्त
रेखिव चित्रें काढुनि केली अंतरिची शोभा
झोंकदार नक्षींत उतरली स्वर्गीची शोभा
तिथें विलासी राहत होते नारायणराव
रंग-विलासीं घालवि अपुलें आयू तें सर्व
पूर्वीं मालक होता श्रीधर, आतां हा भोगी
लक्ष्मीची चंचलता लिहिली विधिनें या जागीं
संपत्ती तर लोळत होती पायाशीं त्याच्या
संततींतलीं दोन अपत्यें दिसति आज त्याच्या
जीव तयाचा, लोभ तयांवर सर्वस्वच दोन
आयुष्याच्या भावि कालचे दृष्टीचे कोन
वसंत, सरला, भावंडें तीं थोर सान दिसती
अरुण उषा नाभिं, फुलें वेलिवर नाजुकशीं डुलतीं
बरोबरीची परस्परांची दिसत असे काया
जुळींच कां तीं लहानमोठीं प्रमाण उमजाया ?
त्या दोघांचें बाल्य वेंचलें पुण्य–पत्तनास

वयाबरोबर शिक्षण घेती ज्ञानाची हौस
तारुण्याच्या बहारांतलीं साजुक तीं सुमनें
यौवनास तर मागें केलें तशांत सरलेनें

बीजेची नव चंद्रकोर जणु सरला हांसविते
वदन--शशीनें पूर्ण--पौर्णिमा--शशिला लाजविते
सडपातळ ती यष्टी करिते तरुणा बेजार
ज्वानीची नव रसरसलेली काया गुल्जार
नजर हांसरी चंचल भारी, तीक्ष्ण जादु तींत
चांफेकाळि नासिका, चौफुली चमके झोंकांत
वदनीं विलसे नव चंद्राचें डोकावुनि तेज
कुंकुम भालीं शोभुन दावी आर्येचें ओज
जणू बैसले रदनीं मोतीं सुंदर, पंक्तींत
ओंठाला पोंवळे लाजती अपुल्या लालींत
नयन--मनोहर वदनावर ती छटा लाजल्याची
हृदयावर ओसंडे युवती नवती ज्वानीची

पिछवाड्याला होती सुंदर सरलेची बाग
जीव तियेचा तींतच सारा, तीच तिचा रंग
मंडपांतली जाई घाली जुइची जणु वेणी
दोघी बहिणी सरलेला त्या मधु गाती गाणीं
परस्परांशीं सुमनें हितगुज करावया सजलीं
कुणी शोभवी वेणी, सरला कुणास कुरवाळी
मंडपांतुनी फिरतां सरला, कानीं गुणगुणती
सहज टाकितां चरण पुढें कुणी चुंबनही घेती
पाहुन हंसतो गुलाब घेउन चांफ्याला संगें
सरलेची ही थट्टा त्यांना परिचित रोज अभंगें
बाग छानशी शोभा देई अतीव टुमदार
सरलेची तर एकावरतीं प्रीति असे फार

मध्य–वर्तुळीं तिनें लाविलें सुंदरसें झाड
तेंच हारवी प्रेम तियेचें, इतरां नच वाड
शिरांशिरांतुन विलसे त्याच्या सौंदर्याचा साज
पानोपानीं निथळत होतें सुंदरतेचें ओज
सरलेनें तर जीव ओतला त्याच्या जीवासाठीं
तोही नित तिज हळूच सांगे प्रेमळ गुज--गोष्टी
निथळे जेव्हां बहार त्यांच्या प्रेमाचा पूर्ण
हळुच तुरंबा--हातच--घाली गळां तिच्या पूर्ण
परस्परांच्या प्रेमैक्याची होई जँ शिराणी
तो वर्षे सुमनांनीं, सरला अश्रु–जलानें न्हाणी
नाजुकतेची सरला होती अखंड निर्झरिणी
तो तर होता वेलच, त्याला साजे ती भगिनी
विश्वाचे सांठले तयामधिं अंतरंग भाव
खऱ्या प्रीतिचा तिथें होतसे अखंड वर्षाव
कोण तियेचें भान हारवी हृदयांतिल वारा ?
तोच मोगरा, सगासोयरा सरलेचा प्यारा.

मैलभरावर निर्झर गाई झुळझुळसें कांहीं
त्या रंगीं तो दंग सदोदित भंग मुळीं नाहीं
सभोंवारच्या रानामधुनी नाद तोच येई
मंगल गाणीं मंजुळवाणीं ईशाचीं गाई
कांठावरची मोहरलेली वृक्षांचीं राई
जींत कोकिला हर्षभरानें गोड गान गाई
प्रभातकालीं फुले फुलांची गर्दी त्यांत अपार
मध्यान्हीं तर छाया पसरे सुंदर तेथें गार
पक्षी फांद्यावरतीं बसती विश्रांतीसाठीं
सहज गळावीं कुसुमें तरुचीं लहानगीं मोठीं
निर्झर–पूजन प्रतिदिनिं आनंदाचें जणु सार
गमे गाळिती मोत्यांचे वा पांचूंचे हार

उंचवट्यावर फडकत होतें निशाण धर्माचें
पावित्र्याचें, पुण्याचें वा ऊज्वल कीर्तीचें
समाधिचा ध्वज भगवा होता वायूनें डुलत
निनाद घुमवी धर्माचा या अनंत विश्वांत
कलश सुवर्णी; अखंड वर्णी समाधिची कीर्त
किरण रवीचे पडुनी चमके पावित्र्यच मूर्त
संगमरवरी दगडाची बांधणी उठे छान
कोरिव लेणीं जणुं भासावी हरुनि घेइ भान
चहूंबाजुला चित्रें दिसती संत--महात्म्यांची
सुरम्य छत्री मधें रेखिली तीही दगडाची
आंत दाविती पूज्य पादुका शांती आत्म्याची
परमात्म्याची प्रतिमा उतरे पादुकांत सांची
जळत्या जीवाची ती शांती हरुनी घे भ्रांती
मांगल्याची जणु ती मूर्ती तिमिराची कांती
सभोंवारला बिल्वतरूंची सुरम्य ये शोभा
वेलि रांगती, चांफा, केतकि, देती नव शोभा
घांट बांधला ओढ्यापासुन समाधिला चढता
समाधिचीं पाउलें जणूं तीं ओढ्याच्या करितां
खालीं पसरे ओढ्यावरतीं वृक्षांची छाया
निसर्ग विहरे ओढ्यावर ह्या पवित्रतर ठाया
रामपुऱ्याला नंदनवन तें आहे वाटावें
सौन्दर्याचे, सौख्याचे नव तरंग उसळावे
थकलेले भागले बापुडे शांत तेथ होती
प्रणय--रंजनी प्रणय--भावना मनास रंजविती
उदासवाणी वृत्ती होई प्रफुल्ल तेथेंच
भाव जळाल्या हृदयाची पण शांती तेथेंच
हृदय जळावें, फूल खुडावें तळमळ ती जीवा
चिच्छक्ती पण तिथें येउनी करीतसे धांवा
गिरिजा--निधनाचा श्रीधर ओकी तेथ उमाळा

समाधिला नित नवीन सांगे दैवाचा घाला

नित्य दर्शनीं रंगत होती ती सरला बाला
निसर्ग लेणें पाहुन हांसे मनांत लडिवाळा
प्रफुल्ल आणी परडी भरुनी सुमनांची ताजी
नांव मोगरा, होतीं तीं पण तिच्याच हृदयाचीं
भक्तिरसाची उतरे गंगा प्रफुल्ल पुष्पांत
भाव उतरती सरलेचे नव सर्व मोगऱ्यांत
वाहुनि सुमनें समाधिला तीं परडींतिल सारीं
हर्ष--भरानें डोलुन मानी मोगऱ्यास भारी

आज मात्र श्रीधरा वाटली सृष्टी नूतन रंगी
मनास लागे चाळा नवखा आनंदच जंगी
दर्शन घेउन घांटावरतीं बसला जाऊन
ओढ्याच्या पाण्यांतच सारी मुद्रा लावून
मधून फेकी खडे तयामधिं सहज भावनेनें
आंतुन देई प्रतिध्वनी तो निर्झर पाण्यानें
जणूं घेतलें सर्व तयाचें ओढ्यानें भान
तोंच घेतलें चोरुन त्याचें सरलेनें ध्यान

रूपसुंदरा यौवन-भारा मंदगती सरला
घांटावरतीं चालत होती चोपुन लडिवाळा
तलम पातळीं शोभे युवती, चोळी पण तंग
हृदयावरचे भाव दाविते छाती उत्तुंग
बावरल्या नजरेंत लपविते श्रीधरचें रूप
तो पण लपवी अचल दृष्टिनें सरलेचें रूप
हळुच चालते, मधुन लाजते, मंदस्मित करिते
गुलाब फुलती नाजुक, वाटे काया रसरसते
मंद वायु, जरि पदर उडेना तरिही सांवरिते

परडी हातांतली उगी की आवळुनी धरिते
मनांत दचके ‘ कुणि पाहिल का ? ’ कोण असे तेथें ?
मनांत होतें कसें, काय तें कोणा पाहवतें ?
मनांतली नव कळी उमलली, नाहीं दाखवली
नजरेला भिडली ती नजरी तदाच हांसवली
हृदय रंगलें, भान भंगलें, चित्तहि तैं गुंगलें
सहज उसळले शब्द खरे, पण मनांत थांबविले
थरकत वृत्ती, चमकत येती, नयनांतुन स्रवती
त्वरकत युवती, परी पळाली काळाची भीती
देहाचें तव भान हरपलें, दुनिया वाटे न्यारी
परडी पडली, फुलें सांडलीं घांटावर सारीं
परी गुंफिती हार मनांतच आशेचा दोघे
चित्त-वेलिचीं फुलें उमललीं प्रिय-दर्शन-योगें
पवनानें तर तदा उडविला सरलेचा पदर
भानावर ती होती कोठें सांवरिल तर सत्वर ?
भाव नादले, विश्व हांसलें, ब्रह्मांडहि डोले
हृदयाचे नव तरंग कोणा उमजू नच शकले

परडी पडली, फुलें सांडलीं घांटावर सगळीं
इथेंच सरला-हृदयाची दौलत उघडी पडली
फुले मोगरा, सगा-सोयरा सरलेचा प्यारा
आज घुमवितो श्रीधरला स्त्री-हृदयाचा वारा
सरला पट मेघांचा, परि नच सरलेच्या सरला
हृदयाकाशीं जिकडे तिकडे श्रीधर घन भरला.

# पाकळी २ री.

## स्वैर आंदोलन.

ध्वनी निमाले, ढग मावळले, नभ स्वच्छ झालें
ताऱ्यांचें नव पटल पसरलें, हास्यच कीं खुललें
सुधारसाच्या चंद्र स्रवतो वसुधेवर धारा
अनंगास बहु देत असे तो नव चैतन्याला
पडती किरणें समाधिच्या त्या कळसावर शांत
सुंदर उठलें चित्र तयाचें तसेंच ओढ्यांत
वृक्षांच्या पानांत जरी ती बारिकशी जागा
त्यांतुनि येती सुधारसाचीं किरणें शांत सदा
कांहीं होतीं फुललेलीं ती सुमनें वृक्षांचीं
चकाकती नव मोतीं सुंदर, शोभा ती त्यांची
प्रशांत निर्झर, प्रशांत छाया, समाधिही शांत
शांत सुधाकर, प्रशांत किरणें, वेली पण शांत
स्वर्गीची शांतता गमे ती मनास निभ्रांत
चक्रवाक पण भकास गाती विरह-ज्वालेंत

गेली सरला श्रीधर गेला देहानें मात्र
खोदुनि तेथें हृत्पटलांचें सोनेरी चित्र
पालवली फुलवेल दिलाची अपूर्व थाटानें
मोहरली, पण तिथेंच हरली वृत्ती छायेनें
मूर्ती ठसल्या, मनांत भरल्या, ढळल्या मुळिं नाहीं
विश्वाचें चैतन्य अर्पुनी चिच्छक्ती जाई ३२०
हृदय डोलतें स्वैर–वायुनें जादुगिरी रंग
चित्त हुडकतें, परि लागेना जादूचा थांग
हांक मारितें कोण ? वाटतें आहे कां येथें ?
परी भराऱ्या जीव मारितो भासे स्वच्छंदें

आनंदाच्या लहरी उठती अतिशय, हृदयांत
उत्सुकता वाढते क्षणानें, अधीर मन होत
हृदय–पांखरूं जीव–लतेवर आंदोलन घेई
सर्वेच उडुनी स्वैर गतीनें ललकाऱ्या घेई
सुरेल ताना छेडित जाई उंच अंबरांत
वाटे हातीं आलें, तरी पण लागेना अंत
कुठून उत्साहाच्या ऊर्मी येती ? उमजेना.
आनंदाचा झुळतो निर्झर कुठून ? समजेना.

घांट सोडला दोघांनीं जंव विरुद्ध इच्छेच्या
नैयन–मनोहर दृश्य दिसे परि समोर नयनांच्या
वळतांना पाउलां वाटली जडता आलेली
पुष्प-परागीं जणूं वाटलें तिथेंच बांधियलीं
दृष्टि उठेना, चित्त ढळेना, जावें वाटेना
स्वैर भावना, मनीं कल्पना खळबळती नाना
जातांना पण मागें वळती श्रीधरचे नेत्र
सुधामृताचे लोट वर्षिती सरलेचे गात्र
पुढें चालतो, मागें बघतो मधेंच थांबून
पुनः पुन्हा जणु घुटके घेतो अधीर होऊन
चंद्र उगवला, परि सरलेचा वदन--शशी ढळला
हंसले तारे, परि सरलेचा हास्य--भाव विरला

गुगत सरला घरांत गेली आनंदें दिव्य
गालावरच्या खळींत उतरे तल्लिनता भव्य
वदनावरची टवटवलेली शोभा नवतीची
धर्म--बिंदुंनीं चमकत केली चढती शोभेची
वसंत पाहुन म्हणतो ' सरले ! कां हा आनंद ? '
दचकली ती, तिथेंच हरली समाधि स्वच्छंद
' कुणीं घातली अशी मोहिनी ! सरले, सांग तरी

काय पाहिली नवीन जादू समाधींत अंतरीं ?
काय बोलली समाधि, हंसला चंद्र तुझ्याशीं कां ?'
सहज विनोदें वसंत घाली प्रश्न तिला नवखा
पुन्हा उसळले भाव, परी ती लपवी सायासें
नाहीं लपले, लाजुन आलें हृदयांतुन हांसें
नाजुक लाली, गालीं आली छटा लाजल्याची
दृष्टि वळाली सहजीं भिडली तिच्याच पायाशीं
'वदूं कशी मी ? नांव कुणाचें सांगूं तरि काय ?
मूर्ती हृदयांतली कशी पण दावूं आतांच ?'
क्षणार्धांतले विचार, सगळें काहूरच झालें
मधूर चिंतन वसंत पाहुन सगळें अंतरलें
'चंद्रच हंसला; थट्टा साजे दादा तुज ऐशी ?
वहिनीच्या मुख--चंद्रें भिडला वाटे आकाशीं ?
वहिनीला आतांच जाउनी विचारत्यें खाशी,
कसा उडविला तुज आकाशीं ?' करिते मखलाशी
तेथुन गेली वहिनीला जणुं खरेंच सांगाया
सरळ आपल्या खोलींत गेली गुपीत लपवाया
भूक भागली, तहान हरली सरलेची आज
नव्या सृष्टिचा नव राणीचा घेत नवा साज
वसंत सरला वाचित होतीं रामायण रोज
वाचुन झालें परि उमजेना अर्थ तिला आज
वसंत शिकवी, मधून टाकी तिच्याकडे नजर
डोळे दिसती चंचल तेथें, लक्ष्य मात्र दूर
खऱ्या सुखाची मूर्त कल्पना मोद खरा तोच
सुख भोगावें परि मोदाचें कल्पनेंत चीज
कल्पनेंतल्या सौख्यसृष्टिचा कल्पतरू फुलतो
जीवाचा सरदार मनाला जांचक तंव होतो
तशीच झाली सरलेची गत आज हुबेहूब
वदून गेली 'वाई ! मेली ! काय तरी झोंप'

दीप विझाला, सरला निजली खरेंच कीं काय ?
मनांत मांडे स्वतांच करुनी मनांत ती खाय
काया होती शयनीं, पण मन श्रीधरच्या हृदयीं
डोळे असती घरांत दृष्टी पाही नवलाई
देह इथें पण हृदय तिथें हें द्वैत कसें भासे ?
हृदय चोरलें श्रीधरनें पण शरिर हिचें खासें
कांहिं कळेना, मुळिं करमेना, रुचे न शय्या ती,
इकडुन तिकडे वळली किति तरी; कोण करी गणती ?
भ्रांत जाहलें मानस, वाटे पिसें लागलें कां ?
' खरी जादु ही; टाकावी पण इतकी भारी कां ?
मन वेडें हें, मी पण आतां काय करूं बाई ? "
सहज भावना ध्वनीत होती ' करमेना कांहीं '
तशीच उठली, सवेंच गेली सरला बागेंत
मनांत कांहीं नव्हता तेथें येण्याचा हेत
मोगऱ्यांतल्या कळ्या डोलती पाहुन सरलेला
जाईच्या कुंजांत दिसे तो मंडप फुललेला
अर्धोन्मीलित गुलाब बघती हंसऱ्या दृष्टींनीं
परि सरलेला कांहिं कळेना फुलले कां नाहीं ?
चंद्राची नवप्रभा पसरली बागेंतुन सारी
रंगविलेला पट शोभे तो नयन-मनोहारी
फिरते सरला इकून तिकडे निर्हेतुक भावें
श्रीधरचें रुप लताफुलांमधिं भरलें भासावें
तोंच विचारी वसंत ' सरले ! आहे काय तरी ?'
पुन्हा चरकली, नाहीं दिसली बगिच्यांत सुंदरी.

---

# पाकळी ३ री.

## मुग्धावस्था.

श्रावण शिरवे सरसर गळती, घुमला नभिं नाद
आकाशाची गंगा सुटली फुटला जणु बांध
भूमी धुपली जलधारांनीं गढूळलें पाणी
निथळत जाई भरवेगानें ओहोळच बनुनी
हिरवळलेलीं कुरणें सुंदर गांव--शिवाराचीं
बांधावरचीं फुलरलीं तीं थाटें गवताचीं
वनवेलींना तोंडें फुटलीं नवीन गोंड्यांचीं
तुषार त्यावर उडुनी शोभे माला मोत्यांची
झाडांच्या ढोलींत जाउनी लपलेले पक्षी
तोंड काढुनी वर्षावाची मौज जणूं लक्षी
थरथरती शेतांत कृषीजन शिरशिरिनें भारी
औत सोडुनी धांवत जाती वृक्षांच्या खालीं

बुरूज पडले, त्यांत उगवलीं रानें गवताचीं
जुनाट होत्या शिळा, भव्यता दावित पूर्वींची
भिंती पडक्या खिंडारांची भेसुरता भासे
आंबराइ त्या खिंडारांतुन डोकावुनि हांसे
दरवाज्याची जुनी भव्यता आजहि पण होती
आंत तयांच्या दों मजल्याची माडी नव होती
दुसऱ्या मजल्यावरच्या खिडकींतून मजा पाही
वर्षावाची, श्रीधर अपुल्या घरून नवलाई
श्रीधरच्या जिवनांतिल फुलली नवी आंबराई
पूर्व-वैभव--स्मृति भासावी धगधगली खाई

दृष्टीमीलन नवीन जीवन मिळून मोहरलें

मन, मायावी हवेंत बांधी वाडे उंच भले
उद्भवलेली नवीन प्रीती स्वैर विहंगामी
दर्शन-प्रीती त्यांतच पुरती, राही विश्रामी
रमला श्रीधर सरलेवर, पण मानस गोंधळलें
स्त्री-हृदयाची नाजुक भाषा अर्थ कसा उकले ?
अमर हारले, असुर भागले परि ती उमजेना
श्रीधरच्या हृदयांत खळवळे कल्पनाच नाना
नव्या प्रीतिचा वीर शोभला उभा सुभेदार
स्त्री-हृदयाचा सुरुंग उडवावयास भरदार
तोंच चमकली तिरिप उन्हाची झळाळलीं किरणें
श्रीधरला शुभ शकुन म्हणोनी उडला उंच मनें
सरी थांबल्या, मेघ निवळले, विहंग भरभरले
आनंदाच्या दिव्यासाठीं वृक्षहि फुरफुरले
गळलीं पानांतलीं मौक्तिकें तुषार-मालांचीं
भूमि न्हाणली, शोभा नटली, मंगल स्नानाची
मंदवले ओहोळ, मिळाले ओढ्याला सारे
लता डोलती मंद वायुनें लवून जल-भारें
समाधिवरतीं श्रीधर जाई दर्शनास नियमें
अधीर होता सरला-दर्शन-सौख्याला प्रेमें

श्रावणांतली शुद्ध पौर्णिमा सण पावित्र्याचा
आनंदाचा, शुद्ध भक्तिचा, सागरपूजेचा
नव्या घनांचें नवीन पाणी पूजी भक्तीनें
सागर देई त्याला अपुल्या पोटांतिल रत्नें
रामपुऱ्याचा ओढा वाही फोंफावत फार
झाला होता भारी त्याला आजच जलभार
अनेक कांटे, कितीक झुडुपें नेई वाहून
गर्व--मदानें भरला वाटे जनांस पाहून

घांट नमविला पाणी त्यावर उदंड फेकून
लाटांची गर्दीच उडविली पवनें वाहून
' फाड फाड ' थापाच देतसे समाधिला वाटे
' फूं फूं ' चा फूत्कार तयाचा आनंदच दाटे
कांठावरची पालवलेली वृक्षांची राई
घालुनि तिजला मंडल, धक्के देत जवें जाई
पुष्कळ पडलीं, किती वांकलीं राईतिल झाडें
कांहीं असती धीर धरूनी उभारुनी शेंडे
उडून गेलीं सर्व पांखरें तरू-निवाऱ्याचीं
भीतिप्रद आवाज सुकवितो वदनें साऱ्यांचीं
मधें वाहती तोंड काढुनी सर्पांच्या जाती
वेटाळीं घालती आंवळुनि सांपडतां खांदी
देवदयेच्या वर्षावानें नितांत रममाण
व्हावा पण उन्मत्त भासला भीषण होऊन

सुंदर फुलला आज मोगरा, किती तरी सुमनें
गळलीं होतीं, सरलेनें तीं वेंचिलिं फुल्ल मनें
फुलें वेंचिते, सरला गाते, कवनें भावांचीं
मोगऱ्यास जणुं शिकवित होती गाणीं प्रीतीचीं
नादिं रंगली, फुलांत रमली मोहनमंत्रानें
मधुर मोगरा आलिंगी ती विशुद्ध प्रेमानें
नयनांमधली अनुरक्ती जंव उतरे गालांत
गुलाबांतली कळीच साजुक दिसे मोगऱ्यांत
मंद वायुनें, लता डोलती बगीच्यांत जेवीं
आत्मानंदीं तशी डोलते सरला भासावी
सहज चालतां जरी लागलीं वेलीचीं पानें
तरी सुंदरी रोमांचित हो मंद पवन लहरीनें
मकरंदांचे थवे लोटुनी मंडल घेतात
गळ्याभोंवतीं भ्रमणाचा जणुं हार गुंफितात

कारुण्याची छटा विलसते, फुलें वेंचतांना
हृदयांतुन जणुं गळून पडती अंतरिच्या भावना
सुंदर केला हार फुलांचा सरलेनें आज
भावनांतला सर्व उतरला तयामधें साज
समाधिवरतीं अर्पण करण्या जीवाभावांनीं
प्रीतिपरागीं जो गुंफियला कोमल हस्तांनीं

सरला बाला बाहिर येई घेउनिया हार
सांथ देतसे वसंत, वाटे उगिच तिला भार
वसंत झाला होता वेडा तिच्याच गुपितानें
त्याला लागे ध्यास, पिसें तिज भरलें तें कवणें
पंथ चालतां, सहज हांसतां, पाही चोरून
सरला त्याला दाविल वाटे हृदयांतिल वाण
द्वार सुरांचें करील उघडें सताड नरदेह
मात्र मानिनी कधीं न दावी हृदयींचा देव
राज्यें लवती पायांशीं, तो सम्राट् सुर--लोकीं
तोच खरा सम्राट मानिनी जिंकी इहलोकीं
शिळा फोडतो पर्वतांतुनी काढुन सायासें
कमल--तंतु जो तोडिल त्याचें जिणें इथें खासें
वसंत सोडी नाद, परि उत्कंठा राहीना
कुणीं चोरलें ध्यान, मनाशीं पृच्छा करि नाना

नाद नादला, पडदे फुटले कानांचे दोन्ही
भीषण लाटा फुंकित जाती कर्कश रव करुनी
पाय धांवती ओढ्याकांठीं मानस सर्वकडे
सरला--दृष्टी फिरली घालुनि समाधिला वेढे
अधीर होते नेत्र, विसांवा मिळून भिरभिरले
शांत जाहले, सर्वेच लवले, भूमीला भिडले
पदर घेउनी वर, झांकियली उन्मीलित काया

तरंग लपवी उफाळलेले, लज्जान्वित काया
देह चालतो, वृत्ति हांसते, होउन बेभान
प्रीति-सारिका डोलुन गाते दिव्याचें गान
हार सांडला, निर्झर घेतो स्वतांच पूजून
नाहीं कळलें सरलेला, तिज नसे देहभान
वसंत पाही, अधीर झाला सत्वर उचलाया
पाय घसरला, शक्ती गेली सर्वच ती वांया
पुन्हा बुडाला, वर डोकवला गटंगळ्या खाई
लाट फेकतां पुढें वाहुनी डोहामधिं जाई
कडा कोसळे सरलेवरतीं, निर्दय तो घाव
तिनें फोडल्या किंकाळीनें भरलें विश्व अभाव
श्वास कोंडले, उर धडधडलें अश्रूंचा पूर
वाहुनि धरिला ओढ्याचा भेसूर तिनें सूर
म्हणे थरारुन ‘ दादा ! दादा ! ’ कंप सुरांतुन जाय
ओसडुंनि हुंदके निघाले अधीर वच ‘ हाय ! ’
करपुन गेले अश्रू, उठलें मनांत काहूर
अनेक होते जन न द्रवला कोणाचा ऊर
संकट समयीं कोण येतसे कामाला आप्त ?
आशा वेडी परी धांवते प्रचंड वेगांत
केविलवाणी नजर घालते घिरट्या श्रीधरभंवतीं
ओळख होती हृदयाशीं पण शब्दाशीं नव्हती
उर डवडवलें, मन तगमगलें भीषण जग भासे
श्रीधर झाला वसंत-सांथी पुरामधिं तो दिसे
कालाच्या दाढेंत कराला सांपडले दोघे
सरला उष्णाश्रूंनीं पातळ भिजवाया लागे
झुंजच होती काळाशीं ती कोण टाकितो मागें ?
नसांनसांतुन अधीर आशा मात्र वाहुं लागे.

मेघ भरावा उष्माकालीं पसरुन व्योमांत

तिमिर हारुनी चंद्र स्रवतो किरणें तंव शांत
नापिक भूमी फुलांफळांला सुंदरता देई
भीषण अंधारांतुन चपला प्रकाशमय होई
तशीं भासलीं वसंत श्रीधर दुरावर चित्रें
हर्षभरानें गुंफिति माला सरलेचीं गात्रें.

---

## पाकळी ४ थी.

## विकास.

जलवंती फणफणुनी फाडी फडाच लाटांनीं
क्रुद्ध नागिणी वसंत हृदयीं येई सरसरुनी
किंवा वाघिणि जबडा पसरुन भीषण क्रोधांत
बसली होती गोड कोंवळा घांस गिळायास
समशेरीचें पातें उपसुनि धांवुन ये काल
कीं जलवंती देवी उतरे घेउन करवाल
घांस तोंडचा उलटत होता गिळण्यापूर्वींच
तोंडिं ठेविला श्रीधरनें हाताचा हातांत
देवदूत उतरुनी जगावर वसंत वांचविला
देव भासला प्रेमळ, श्रीधर वसंतहृदयाला
माता ऐकुनि हुंबरली जणु गायच हुंबारे
पितयाचें पण हृदय द्रवलें भरलें जल–भारें
हृत्सिंधूवर उठल्या लाटा भयाण, दुःखाच्या
हेलावत आंदोलुन जाती नौका जीवाच्या
शीड कडकडे मोडूनि गेलीं नौकाअवजारें
झंझावातें झोला दिधला, प्रचंड करि मारे
तोंच येउनी वसंत धांवुनि घट्ट मिठी मारी
'आई!' शब्दामधें उतरल्या चिद्गंगा–लहरी
किती तरी लाविते उराशीं माता तत्काया

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ३८७१
शाखा (स्थळ

बोलत होती खळखळ गळुनी अश्रूंनीं माया
दुःखांतुन आनंद उठावा उफाळुनी तेज
अंधारांतुन चमकत यावें सूर्याचें ओज
अश्रुबिंदुची सरिता उतरे खळखळ वाहून
दुःखाचें वा आनंदाचें मिश्रण होऊन
श्रीधर झाला देवच तेथें सर्वां आवडता
सरलेची तों खुलली होती सुंदर भावलता
श्रीधर होता जीवजिव्हाळा तिथें वसंताचा
गळ्यांत उतरत नसे तयाविण कणही घांसाचा

प्रीति वाढते प्रीतीनें, मन मिळे मनालाच
प्रीतीवांचुन जगांत नाहीं आशा जीवास
आशा वाही नसांनसांतुन तरीच जिव हांसे
आशे–वांचुन जीवन भासे जालांतिल मासे
मासे मरती बाहिर येउन तरी जीवनाच्या
आशा नाहीं तोच मृत्यु, पण आंत जीवनाच्या
जोंवर आशा असे मनीं तोंवरीच जिव प्यारा
आशा जीवन जीवाचें, तो जीव सृष्टिचा सारा
आशा हांकी राष्ट्र, सुखाची उच्च भावना तीच
आशेविण नाचती जलाचे तरंग वरतींच
आशा–हृदयीं सर्व सांठलें सृष्टीचें भव्य
विद्युत्शक्ती चमके हृदयीं आशा ही दिव्य
प्रीति आम्रतरु सुंदर त्यावर आशा कोकील
गाणीं गाउन प्रीत–कृपेची करुणा भाकील
प्रीति–सागरीं तारु जातसे सरसर वेगांत
आशा दावी मार्ग तयाला गाढ्या तिमिरांत
आशा प्रीती बहिणी, परि ती प्रीति मात्र दूर
आशेला हांसवी दुरूनच मधुर तिचा सूर
श्रीधरची वाहते तदातर आशा भरधांव

आपुलकीनें वाढत होती सरलेची हांव.

पूर्व दिशेला कोण उधळतो गुलाल आनंदें ?
पाहुन कोणा सती गातसे गाणीं स्वच्छंदें ?
लाजुन कोणा उठली लाली कोमल गालाची ?
हर्षभरानें नेत्र गाळिती सुंदर दंवमोतीं
पहांटवारा स्पर्शुन देई अनुरक्तीं गोडी
सती लाजुनी मुरकत विनवी ' अरुणा ! मज सोडीं ! '
टपकत होतें दहिंवरमोतीं जाइजुईंतून
लता पाहती लाजुन खालीं माना मुरडून
भ्रमर गुंगुनी उड्या मारिती फुलांफुलांतून
घिरट्या घालुन मंजुल गाती ' गुं गुं ' नादून
मंद वायुनें सुगंध वाहुन दरवळली बाग
आलिंगनि रंगून फुलविती फुलें कोमलांग
फुल-राणीची नाजुक काया भ्रमर-स्पर्शांनीं
होऊं नये घायाळ, म्हणोनी लपली तरु-पानीं
नजर चुकवुनी कौतुक पाही सरला वेल्हाळा
फुल-राणीचा पदर उडवुनी धरी भ्रमर तिला
चुंबन घेतां लज्जा-लहरी कशा ? तिला न कळे
अ-लग किशोरी होती, पण उत्कंठा कल्लोळे
हांसत होती फुल–राणी मुख लपवी मुरकून
तोंच पळाला भ्रमर गुंगुनी, चुंबन घेऊन
पुन्हा हांसली, पानीं लपली, फुल–राणी गेली
सरलेशीं ' फू गडे ! ' म्हणूनी धरणीवर गळली
तंवर उधळले अश्व रथाचे धरणीकांताचे
पिंवळा शालू हर्षुनि आणी लेणें धरणीचें
नेसुनि प्रेमें हर्षभरानें उत्साहीं दिव्य
तिला येतसे अपूर्व शोभा नटल्यानें भव्य
श्रृंगाराच्या सुंदर लहरी उठल्या विश्वांत

सर्वच वठल्या सरलेच्या त्या नितांत, बागेंत
हिरव्या पानांतून चमकलीं फुलें मोगऱ्याचीं
हळुच पाहती लपून सगळे गंमत सरलेची
पिंवळीं किरणें पडून झालीं पिंवळी ती बाग
निसर्ग शोभेमधीं रम्यसा भरला नव रंग
गेली सरला हांसत वाला जवळ मोगऱ्याच्या
कर लडिवाळें फिरवुनि करिते गोष्टी प्रेमाच्या
तोंच हांसलें एक फूल तें घेउन हातांत
चुंबन घेउन जणूं लपविते अपुल्या हृदयांत
" सख्या फुला तूं तूंच जिवाचा प्यारा गुलहौशी
तूंच खरा मम देव, जगीं मी तुझी एक दासी
तुझ्याच साठीं उडी घालितो दादा डोहांत
तूंच स्थापिली मूर्ती मोहन माझ्या हृदयांत
भूतदया किति ? वानिल माझा अबलेचा शब्द
परोपकारीं कर्मी किती तरि नभांतील अब्द
जीव टांगला दैवावरतीं, शूलावर देह
औदार्याची सीमा झाली, मुळीं न संदेह
तूंच खोडकर; किती तरी तूं त्रासविलें तिकडे !
माझ्यासाठीं उडी घातली ? सांग सांग ना गडे ! "
प्रेम--रसाला उधाण आलें खळखळुनी तेथें
जीवाच्या भावना उसळल्या प्रगटुनिया शब्दें
कोण अडवितो जीव ? नाचतो पवनाच्या संगें
देह अडवितें सूत; परी तो जीव मात्र रंगे
" तूंच सुखाचें सार, तुझ्यावर काया कुरवंडी
करिशिल ना ! हें काम ? सांग मी हो कां पायघडी ?
प्रेम खरें कां मजवर, वर्षे वृष्टि कृपेची कां ?
धन--दौलत जीवाची सारी माझ्यावरतीं कां ?
सांग गोजिऱ्या, राजस सुमना होइन कां दासी ?
कंठ घालुनी माल तुझी कां नेइल करपाशीं ?

हांसु नको तूं, यासमयीं कां थट्टा तुज गोड !
सांग सख्या मज पुरेल कां रे जीवाचें कोड ?
तूंच कारणीं, कार्य तुझें तूं, शेवट तूंच खरा ”
तुझ्याचसाठीं कवि–हृदयाची ओंजळ सुकुमारा
“ मानस वेडें, काय बडबडे ? ” सागर ओसंडे
“ बाइ ! कशी मी सुरेल ओढूं हृद्वीणा–वेढे ?
गळेल कां नव तार मधें ही भीती आतांच
तुझ्यासारखे लपंडाव कां होतिल पहिलेच ? ”
कसें बोलतें सुमन तिच्याशीं उद्भवती कोडीं
नाजुक भाषा मुग्ध भावना ज्याच्या तो सोडी
तोंच कपोलीं आली लाली रागाची थोडी
“ किती आळवूं सुमना ! तुजला दया न कां थोडी ?
जा, मी नाहिंच पुढें सांगत्यें कुर्वाळिन तुजला
बोल सख्या तूं, शब्द एक तव बोल कुठें दडला ?
स्तवित्यें तुजला, देवच माझा रागवला काय ?
हतभ.ग मी हाय ! जाहल्यें अतांच कीं काय ?
तुझ्याचवरतीं जत्रा सारी उभारिली मोदें
तूंच पळावें, उडून जावें वनांत स्वच्छंदें !
ठाव बघावा पण कां इतका कोमल जीवाचा ?
मी तर अबला ! साहुं कशी मग खार वेदनेचा ? ”
पुन्हा लपविते, वरी काढिते फुल गोजिरवाणें
तयांत भरलें सर्व तियेचें जीवन धनवाणें
“ तूंच गळूनी पडला ना मम परडींतुन तेव्हां
विसरलास कां इथेंच ओळख ? बोला ना ! देवा !
नाहीं बोलत ? अशीच जात्यें निघून येथून
पुन्हा पण अशी.........अतांच सांगून ”
खरीच फिरली सरला त्यावर खरीच रागून
तिनें फेकिलें फूल, झेलितो श्रीधर मागून
वसंत हांसुन म्हणतो ‘ सरले ! फूल पावलें ना ? ’

दचकुन फिरली, तोंच उसळले भाव तिचे नाना
मुरकुन खालीं बघूं लागली बाला मुग्धा ती
लाली लपवी, पाय नखानें उकरोनी माती.
हळुच पाहते श्रीधर, चोरुन नेत्र वसंताचे
तिथेंच भरली खरी खुमारी, प्रीति तिथें नाचे
प्रचुर विनोदी वसंत, उसळे तोंडांतिल शब्द
'हवा कशाला चंद्रकमलिनीमधें निळा अब्द ?'
'कांहिं तरी भलतेंच' निघाली खालुन स्व-माला
टाळी देउन श्रीधर 'वा !' नें मधेंच उत्तरला.

---

## पाकळी ५ वी.

## लावण्य.

विकास झाला, लावण्यानें कलिका टवटवली
डवरुनि साऱ्या ताठरलेल्या शिरांत रसरसली
कोमलता किति, लचकुन जावी नाजुक लहरीनें
साजुकता किति, चटकत होती पहांटकिरणानें
प्रेमळता किति सुकून जावी अ--लग विचारानें
तन्मयता जणुं मृण्मय व्हावी अलग राहिल्यानें
मूळच सुंदर, तिखंड सुंदर सुंदरता गाजे
विकास झाल्यावरीच त्याची सुंदरता साजे
लतिका रांगुन सुंदर दिसती कलिका--सौंदर्य
जोंवरि नाहीं विकास तोंवर लपलें सौंदर्य
विकास झाल्यावरीच चमके देहाचा जन्म
लावण्याची साजुकता पण तदाच उपगम्य
आशा पाही विकास; इच्छी प्रीती पण तोच
कलिका इच्छी विकास, देही पाही पण तोच

प्रेम इच्छितें विकास, तो जगिं सर्वांचें इष्ट
प्रीती होई विकास नाहीं पाहुनि मनिं रुष्ट

धन्य धन्य तो जीव जयाचा विकास प्रीतीच.
प्रीति विकासीं, विकास प्रीती इष्ट प्रीतीच
इष्ट साधलें, मानस झालें प्रशांत प्रीतींत
भाग्यवान तो जीव खरा या नश्वर विश्वांत
प्रीतिसारिका सुंदर गाउन सुरेल कवनांत
हृदयाला ती शांतवि मंजुल मधुतर नादांत
प्रीति--वेणुंतुन मधुरा रम्या ललकारुन तान
भारुन जगता श्रेष्ठ जाहला मारुन हृद्बाण
धन्यवान तो जीव, सफलता ज्याची प्रीतींत
भाग्यच त्याचें, सार्थक झालें जन्मुन विश्वांत
प्रीतीसाठीं तळमळणारें विश्व भासतें कां ?
दिव्य प्रीतिचा ठेवा दुनिया लुटिते सगळी कां ?
'हर ! हर !' देवा प्रीति चीज ही कशास दावावी !
प्रीतीसाठीं दुनिया सारी कशास भारावी !
भारावी, पण अर्पु नये ही रीत कशी देवा ?
हिरे माणकें दावावे हा त्यांत असे कावा.
सरला नाजुक प्रीतीसाठीं तळमळली नुकती
तोंच मिळाली तिला खरोखर स्वर्गीची प्रीती. ७२८

कोण उकलतो भवितव्याचे नाजुक नव धागे ?
ज्यासाठीं मन भटकत फिरतें, परि न अंत लागे.
भवितव्याच्या दुनिया बुडली भीषण डोहांत
भास भासला, गुंगत त्याचा मागच काढीत
त्यांत डोलते, गाणीं गाते, भरारते स्वैर
भवितव्यीं पण काय ? कळेना सौख्यचि वा असुख
भवितव्यामधिं काय दडालें माणिक वा पांचू ?

किंवा भीषणता, जी काढी डोळ्यांतुन आंसू
भवितव्याची आशा-बेडी पडतां पायांत
खळाळत्या नादांत जखडवी विश्वाची तांत
भवितव्याची कांस धरोनी भिरभिरतो जीव
आयुष्याचा काल कंठतो सुखांत पार्थीव
साधी भोळी सरला बाला गुंगे आनंदें
भवितव्याच्या मोद-लकेरीमधें स्वसुखकंदें

स्त्री-हृदयाची अल्लडता, किति स्वभाव खळखळता
हळवी वृत्ती, शिल ओजस्वी, हृदयीं प्रेमळता
प्रीति श्रीधरीं, वृत्ति रंगली शांती युवतीची
होती भ्रांति, परी हारली करणी सुमनाची
मनांत करिते विचार अपुल्या भावी सौख्याचे
लग्न विधीचे संसाराचे, नव्या जीवनाचे
पवित्र लहरी सु--विचाराच्या उच्च भावनेनें
देती टवटवलेले मौक्तिक--सर लावण्यानें
मनांत खळबळ किती तरी, पण दिसत न कोणाला
मनांतली नव कुसुम--मालिका अर्पण हृदयाला
जेव्हां येतें उधाण, उतरुन पडतें कोठेंही
मनांतलें हें उधाण हृदयाविण उतरत नाहीं
कुठें तरी ओकून करावा हलका हृत्सिंधु
ओहोटावे प्रेमभरानें नयनांतुन बिंदु
मधून वाटे सरलेला कीं ओकूं दादाशीं
‘ वहिनीपाशीं कीं आईशीं दावूं कोणाशीं ’
‘ दादा ’ पण तो बोलुन फजिती उडविल थट्टेनें
‘ वहिनी, आई ’ लाल जाहले कपोल लज्जेनें
सरळ निघाली बगीचांतली कलिका टवटवली
डवरुनि साऱ्या ताठरलेल्या शिरांत रसरसली

मेघ–नृपानें उधळुनि नुकत्या मोत्यांच्या राशी
सृष्टि न्हाणली अभ्यंगानें जल–भारें खाशी
कुंतल ओले पसरुन बसली लतिका रूपांनीं
फुललीं होतीं शिरें तयांचीं कोमल कुसुमांनीं
पवन वाहुनी फड फड करिती रानांतिल झाडें
वाळत होते कुंतल वाटे कुरळेसे शेंडे
प्रभाकराचीं कोमल किरणें लकलकलीं सारीं
अलक वाळुनी त्यांत गोंविल्या मोत्यांच्या हारी
गढूळलेलें पाणी वाटे भांगच अवनीचा
ठायीं ठायीं श्रृंगारच जणु नटला देवीचा
क्षरलेचा श्रृंगार सर्व तो तिच्याच बागेंत
विश्व--मोहिनी भरली सारी तिच्या मोगऱ्यांत
लग्न--वेळची मंगलता तिज भासे आतांच
हस्तांदोलन--सुखमय–कुसुमें दरवळलीं सांच
आनंदाचें भरतें येउन तन्मय कीं व्हावें
उफळुनि लहरीवरतीं लहरी येतां पोहावें
" करूं कशी मी माला साजुक सुमनांची बाई ?
देइल कां आनंद मनाला रुचेल कां नाहीं ?
मोहन सुमनें सुंदर गुंफुन करीन तो हार
तोच रहावा श्रेष्ठ जिवाला, सदा तोच प्यार
हृद्भावांची ओंजळ भरली ओतुन त्याच्यांत
चतुराईनें अर्पिन प्रेमें सुंदर डौलांत
सर्व फुलें त्या दिवशीं घेइन फुल्ल मोगऱ्याचीं
सुगंधांत तल्लिनता सारी व्हावी वृत्तीची
पण देशिल कां इतकीं सुमनें त्या दिवशीं सारीं
तुझीच सारी कृति दिल्यारी तूंच मनोहारी. "
आलिंगिली बालिका किती पण मोदानें त्याला
अर्पुन वाटे दौलत सारी त्याच मोगऱ्याला
तिथें रंगली, तोंच गळालीं फुलें मोगऱ्याचीं

भवितव्याची साक्ष देतसे सरला–आशेची
हर्ष जाहला, पुन्हा दाटली खळबळ हृदयांत
आनंदाश्रू चमकुन आले प्रेमळ, नेत्रांत
जीव जाहला अधिर, दिला पण धीर मोगऱ्यानें
आशा गेली पुढें वाहुनी वायू–लहरींनें
तोंच वेंचिलीं सुमनें सारीं सरलेनें प्रेमें
भरलीं ओटींतच, जणुं दिधलें वाण मोगऱ्यानें
पुन्हा पातली विवेक–माला विवाह–मालेची
तिला वाटलें करुन पहावी अतांच ती सांची
म्हणुन बैसली तिथेंच, हरलें चित्ताचें भान
गाउं लागलें चित्त मनांतच प्रीतीचें गान
कशी करावी माळ ? म्हणोनी विचार खळबळले
नयनांपुढतीं श्रीधरचें मग चित्र उभें केलें
'असाच शोभे हार' म्हणाली आनंदुन वदनीं
मात्र करीना कृती तयाची कांहीं हस्तांनीं
तोंच म्हणाला श्रीधर येऊन 'माळ कशी शोभे ?'
दचकुन उठली, लाजुन हंसली, नयनीं अश्रु उभे
मनीं हर्षली, प्रसन्न उठली मोदाची लहरी
पदर सरकला, फुलें उधळलीं ओटींतिल सारीं

वर्षावच तो गोड, फुलांचा प्रीति–करांतून
शुद्ध प्रीतिची नजर खरी ती शुद्ध भक्तितून
नसांनसांतुन हर्ष उदेला सुमन–स्पर्शांनीं
गोड सुखाशा भावी हंसली खवली तन्नयनीं.

# पाकळी ६ वी.

## परिमल.

दिन दसऱ्याचा आज उगवला पूर्व-वैभवाचा
वैभव-गीतें गातां गातां कुंठित हो वाचा
गत विभवाची स्मृती, खरी ती सीमा दुःखाची
विभवानंतर दरिद्रता ही खाई ज्वालांची
श्रीधरचें मन आज जाहलें चिंतांनीं व्यग्र
भाजित होती पूर्व-स्थितिची ज्वाला त्या उग्र
'विजयादशमी तोरण तुटलें दों दिवसांपूर्वी
मान लवविती येथें सारे सुभेदार गर्वी
मुजरा पहिला इथें होतसे तरवारीवरतीं
जहागिरीची सर्वमान्यता लोळत ये पुढतीं
आज पण कुठें दडलीं विभवें हरलीं कां सारीं ?
मोतीं उडुनी फक्त राहिल्या शिंपांच्या हारी
फुलें वेंचिलीं तिथें आज कां साऱ्या वनशेणी ?
पांचू बसती तिथें राहिल्या गोट्यांच्या गोणी.'
गत विभवानें जीव उडविला तोंच दिसे आई
'आई!' म्हणतां हुंदकला तो आवरला नाहीं
एकामागून चित्रें येती समोर डोळ्यांच्या
तोंवर येती नयनाब्धींतुन लाटा पाण्याच्या
सर सर गळले अश्रु, कशाचे ? मोतिंच ते सांच
डबडबलेलें हृदय वाहिलें पाडुनियां खांच
स्फुंदत होता, हुंदकल्यानें नेत्र लाल झाले
वदनावरतीं विषण्णतेनें चित्र उभें केलें
परी राहिना, पुन्हा उसळला सरसर वाहुनिया
कोण येतसे शांत काराया अंतर पाहुनिया !
अंतरांतल्या तीव्र वेदना जाणतसे कोण ?

कोण उतरितो हृदयावरुनी लिंबू वा लोण ?
विदग्ध दावाग्नीची ज्वाला धगधगुनी उसळे
अडकुन पक्षी पंख हालवी फडफडुनी सगळे
कोण सोडवी त्याला तेथून उपकारी माया ?
भवितव्याची गांठ असे तर सहाय प्रभुराया
त्या प्रभुवरतीं भार देउनी एकाकी जीव
स्तब्ध जाहला हात मारुनी म्हणून ' दुर्दैव '

दुसरा मजला श्रीधरचा तो, बैठक सुंदरशी
रंगविलेल्या भिंती होत्या नुसत्या शोभेशीं
जुना गालिचा बैठकींतला पूर्वींचा अजुनी
पसरविला तो नवाच भासे आजहि पाहूनी
मधेंच होतें सुंदर ' टेबल ' गोल बहू नामी
चहुं बाजूंला खुर्च्या होत्या कांहीं आरामी
छायाचित्रें भिंतीवरतीं पूर्वज ते त्याचे
मध्यभागिं त्या सुंदर होतें चित्र तुकोबाचें
श्रीधर होता आज आपुल्या घरींच केव्हांचा
गाळित होती अश्रू नयनीं मनांतली वाचा
मागें होता वसंत पाहत श्रीधरची मौज
त्यास दिसावा जिकडे तिकडे विनोद वा मौज
मनांत करुनी विचार, श्रीधर फसवावा आज
चोरुन लपला भिंतीमागें संधी बघण्यास
परि श्रीधरची पाहुन गति ही करुणा–भावांची
हृत्पटलावर कारुण्याची प्रज्वलता वाची
विनोद थट्टा जाउन सगळे, गंभिरता आली
शून्यत्वाची विषण्ण छाया वदनावर फिरली
पुढें होउनी बसला जाउन खुर्चीवर एक
टोपी ठेवुन मेजावरतीं, प्रश्नाचा रोख
श्रीधर होता शून्य, तयाला बोलवे न कांहीं

स्तब्धतेंतली भीषणता ती, नजर मात्र पाही;
वसंतास पण तसेंच झालें शब्दहि उमटेना,
टकमक पाहुनि पुन्हा वांकल्या खालीं द्वय मौना
विचार; अपुरें होतें त्यांना काळिज श्रीधरचें
शब्द जिभेवर येती, पण स्वर आंत आंत नाचे
'काय श्रीधरा! आज कशाची व्यथा मनाला ती'
पुन्हा गळाले श्रीधर--नयनांतून नवे मोतीं
हृदयाची हळुवारताच ती उठली शब्दांनीं
'फुलें वेंचिलीं तिथें आज कां साऱ्या वनशेणी
दुर्दैवाची वक्र शलाका धगधगला देह
रान भासतें निर्जन, माझें सुंदर जरि गेह'
पुन्हा थांबला, अधर हालले थरथरला वरतीं
विनोद उठला, वसंत वदला स्वभावप्रवृत्ती
'आले आतां दिवस जवळ हे खुलुन वनश्रीचे
निर्जन रानामधेंच फुलतिल जाईचे बगिचे
हृदयावरचे घाव पुसटले जातिल पूर्वींचे
हेमंतांतच गुलाब फुलतिल अधरीं थंडीचे'
खिन्न हांसला, श्रीधर वदला 'धन्य!' वसंताला
'कुठें कशीही मनस्थिती पण धन्य विनोदाला'.

शरदतूनें हात फिरविला कोमल, रानांत
फुलुन वनश्री करिते त्यावर शृंगारें मात
शाळू पिकला, कणसांमाजीं टपोरले दाणे
उडतांना टोंचिती बसुनी पक्षी चोंचीनें
गोफणगोटे भिंगत येती माळांतुन वेगें
'भर्र भर्र' आवाज निघाले तेथें आवेगें
शेतकऱ्यांची दृष्टी खिळली रानांतच सारी
तीच देतसे हिरे माणकें दरिद्रताहारी

थंडी नुकती फिरूं लागली, फुटलीं तीं तोंडें
वनबाला वेणींत घालिती गवताचे गोंडे
माळकरी पण पाय घालिती रात्रीं पोटांत
रानांतच राहून रक्षिती पोटाचा भात
भावि सुखाच्या स्वप्नांमाजीं कृषिकर्मी चूर
वाऱ्यासंगें डोलुन धरिती आशेचे सूर
भावि सुखाशा आज डोलवी झुलवी पवनांत
विचार-लहरी राज्य अर्पिती स्वर्गीचें सांथ
परी कळेना भवितव्याचा कसा असे अंत ?
तरी सुखाशा धावत जाते करूनिया मात
भोळी सरला भावि सुखाशा स्वप्नांनीं गोड
झाली होती आनंदाच्या भारीं मन्मूढ
संध्यासमयीं तिनें घातला सडा कुंकवाचा
मधून पट्टा रंगविला मग पिंवळा हळदीचा
रांगोळ्यांनीं आली शोभा विचित्र रंगांनीं
खुलुनि दिसाव्या म्हणुनि भरविला गुलाल बाजूंनीं
ठायीं ठायीं फुलें उधळिलीं पूजन जणु त्यांचें
मधेंच मोठें बळिराजाचें चित्र गोमयाचें
उत्साहाची आज भासली सरला निर्झरिणी
सजवित होती अंगण सारें नूतन जोमांनीं
लगेच केली वेणी अपुल्या फुल्ल मोगऱ्याची
अलक- ग्रंथिवर बांधुन प्रेमें सुंदर डौलाची
सीमोल्लंघन झाल्यावरतीं ओवाळणि आज
म्हणुनि भूषवी काया नाजुक सुंदर घे साज
वसंतसंगें श्रीधरला पण ओवाळणि होती
म्हणुनि फांकली प्रभा विकासी वदन--शशीवरतीं

मंगल वाद्यें, सणया, भेरी निनाद मंजूल
चौघड्यांतुनी सांथ झडतसे, वाद्यांचे घोळ

झंकाराचे उठले जिकडे तिकडे पडसाद
रामपुऱ्याची नौबद दुमली रीत पिढीजाद
लोक मिळाले, पुढें चालले नारायणराव
जहागिरीचा त्राता मानी होता उमराव
गूढ विचारी वसंतश्रीधर दिसती दोघेही
मागुन जाती सीमोल्लंघनिं हृदयाचे स्नेही
ठरला वाटे निश्चय कसला दोघांचा हृदयीं
हाता मिळती हात, मुखावर नूर मोददायी
तोडुन गर्दी पुढें निघाले समाधिला भिडले
हर्षभरानें दोघांनीं तैं मस्तक वांकविलें
अष्टांगांनीं खरी सांगता झाली मागून
परस्परांचें हृदय मिळालें, आलिंगन खूण
देउळांतल्या मूर्तीवरतीं सोनें उधळून
सर्व देउळें वंदुन येती मनांत हर्षून
दारीं सरला उभीच होती घेउनियां दीप
सौंदर्याची कलिका नाजुक, मनांत निष्पाप
भरजरि शालू चोपुन खुलवी काळा भरदार
चंद्रिकाच ती भासत होती घनांतली गौर
तंग कंचुकी, तलम रेशमी बाहूवर उमटे
पदर खोंचला, नेत्र चमकती, रूप तिचें गोमटें
वसंत ओवाळुनी प्रेमलें घरांत पाठविला
सोनें सगळें अर्पुन तिजला हांसत तो गेला
जातांना पण वदून गेला सरला-कानांशीं
' दों महिन्यांचा अवधी, त्याची ओवाळणि खाशी '
सहज मुरडली मान, हांसली पंक्ती रदनाची
मात्र मिळाले नेत्र, चोरिली दृष्टी श्रीधरची
बघुन श्रीधरा, जरा चमकली थरथरला दीप
सहज सरकला पदर, चहुंकडे नजर अपोआप
हात चपापे, मात्र रंगला जीव जिवाभंवतीं

धाडस मोठें मनांत, झाली ओवाळणि पुरती
तोंच निघालें बाहिर सोनें, प्रीति–भक्ति--भेट
सहज अर्पितां हात घेतसे हाताची भेट
स्पर्श जाहला, उभे राहिले भरभर रोमांच
थरारल्या चिद्‌वृत्ती, चमके नेत्रांतुन सांच
मनांत भलती खळबळ झाली, उडलें जणुं भान
हरे कल्पना वर्णाया तें गुंफुनिया गान
तोंच परतली, सरला वळली लगबग गोड किती !
वेणी दिसली टवटवलेली, अलकांतिल मोतीं
परिमल शिरला, नसांत भरला, देहहि दरवळला
गुंगत श्रीधर झुलला, पण तो जीव मात्र हरला.

---

# पाकळी ७ वी.

## भ्रमरगुंजन.

गळ्यास आली सरला वाला योग्य विवाहाला
मातापितरां जडली चिंता, खाते कलिजाला
“ मान, मरातब, व्याही, विहिणी भरलेल्या गेहीं
तिथेंच देइन सरला माझी ” वदत असे आई
हांव पित्याची धांवत होती पैशावर भारी
समान दर्जा, जहागिरीचा आणि सुभेदारी
वतनवाडिचा थाट, मासला अपूर्व झोंकांत
अगम्य सारी रीत तयांची हौस विवाहांत
श्रीधर विषयीं हट्ट, भावना खुळी वसंताची.
पाहुन उसळे क्रोध, दिसावी लाली नेत्रांची
भोळी सरला कुठुन विचारी उमजे हा भाव.
श्रीधरवांचुन तुच्छच मानी रंक आणि राव

नारायणरावांचा मानी स्वभाव उमरावी
ऐट हांसरी खोंचक नजरी नेत्रांतुन यावी
शब्दांमधुनी झोंक दिसावा हुक्मी थाटाचा
विशाल भालीं खूण दिसावी भाग्याची त्याच्या
चाळीशींतिल उलटुन गेला तोरा तरुणाचा
रोखित होता तरी अजूनी भर त्या ऐटीचा
विचार ठरला, वर पाहियला सरला-लग्नाचा
कृष्णपुरीचा दत्तक होता भास्कर नांवाचा

इनाम वतनी बारा गांवें, जहागिरी प्रांत
लक्ष्मी झुलवी हिंदोल्यावर बसवुन सौख्यांत
उभ्या ठाकल्या द्वारिं विलासी सौख्याच्या राशी
पंचारति ओवाळित होता कुबेर पायाशीं
दास, दासि, परिचारक सारे परिजन भाग्याचे
लुटीत होते, सौख्य-कालचे होरे विभवाचे
धनमानाची वाहत होती सिंधू उतरून
विभवानें तर केला होता तिथेंच सोपान
नारायणरावांनीं केला निश्चय पाहून
' सरला बाला इथेंच माझी देउन सुखवीन. '
हुंडा ठरला, देणें, घेणें, व्याहीविहिणींचें
उणिव न व्हावी, सर्व पुरावें लेणें इच्छेचें
अपुल्या पण विभवाचा सारा दिमाख दावावा
श्रेष्ठ ठरावें आपण, इच्छा नारायणरावा
भाग्य दिसावें जहागिरीचें, उमरावी ऐट
बघुन भुलावें, म्हणुन ठरविला गांव एक भेट
विवाहांतली ऐट दिसावी स्वतंत्र अपुलीच
धनमानामधिं चमकुन यावी दृष्टी अपुलीच
हीच पुरावी इच्छा, म्हणुनी मोद मना झाला
आतां फुटती अंकुर वाटे त्यांच्या भाग्याला

विवाह ठरला सरलेचा हा कितितरि थाटाचा
मात्र कल्पना नव्हती तिजला, श्रीधर देव तिचा

लग्न वाटलें काय धनाचा दिमाख भाग्याचा ?
विवाह म्हणजे अपूर्व संगम उज्वल प्रीतीचा
लग्न नव्हे तें, ऐट दिसावी जगिं श्रेष्ठत्वाची
विवाह म्हणजे लता डोलती अंतर-भावांची
लग्न नव्हे तें, उजळुन द्यावी काया कन्येची
विवाह म्हणजे गोड खुमारी गृहिणी-सौख्याची
लग्न नव्हे तें, कर हातांची उभयांना भेट
विवाह म्हणजे जीव-शिवाची जगतावर भेट
लग्न नव्हे तें, प्रदर्शनांतिल दर्शन दृष्टींचें
विवाह म्हणजे साक्ष अंतरीं दर्शन प्रीतीचें
लग्न नव्हे तें, विकली जावी हुंड्यावर काया
विवाह म्हणजे प्रीती-दौलत अर्पण प्रिय हृदया
लग्न नव्हे तें, मानमरातब लटका विभवांत
विवाह म्हणजे चैतन्याचा लाभच विश्वांत
लग्न नव्हे तें हौस मनाची, दृष्टी जगताची
विवाह म्हणजे प्रेम--मयांची वृष्टी प्रेमाची.

कोण जाणतो विवाह असला मंगल प्रीतीचा ?
कुणा लाभला ठेवा असला सोज्वळ प्रीतीचा ?
भाग्यवान जगिं कोण ? प्रीतिचा भक्त एकनिष्ठ
मात्र मिळेना कुणा प्रीति ही कुणी न संतुष्ट
भोळी सरला मानित होती श्रीधरला देव
नसे कल्पना रडविल तिजला पुढतीं दुर्दैव.

## पाकळी ८वी.

## मधुस्त्राव.

मेघ गाळिती धर धर धारा नभांतून नेमें
चातक पक्षी घुटके घेती आनंदुन प्रेमें
गौरचंद्रिका हात पसरितां कासारीं जेवीं
नील कमलिनी हांसत उठुनी सुंदरता सेवी
पाणी देउन तुडुंब व्हावा केळीचा वाफा
फोंफावत जैं ताठरलेला नाजुक नव गाभा
भावि सुखाच्या सुधारसाचे सागर भरलेले
जीव घेतसे अधीर भरुनी तुडुंब रस पेले
आंत पोहतो, हात फेकतो, सपासपा पुढतीं
नैराश्याचा नक्र चिरडुनी ये आशा--भरती
उचंबळे मन आंतुन येती लोट पुढें सारे
जणूं वाहतें अमृत साऱ्या नसांत जल--धारें
भाव तरळती हृदयावर जणु मेघ अंबरांत
स्वातीमाजीं शिंपा तरळति जशा सागरांत
हेतु--सफलता नाहीं तोंवर धडपड ही सारी
भावनांतली गोड माधुरी चित्त पुढें सारी
विजयादशमी सीमोल्लंघन सरलेचें झालें
विजय मिळाला म्हणून श्रीधर आनंदें डोले

शरदृतूच्या दों महिन्यांच्या खुललेल्या कालीं
युव--युवती जन मना रमविती प्रणय--भाव--जालीं
हेमंताची गोड खुमारी विलसे अधरांनीं
शरदृतू पोंचवी तयाचे निरोप वाऱ्यांनीं
पहांटवारा साखरचुंबा घेउनिया गोड
प्रीति-जनांची स्वप्नसमाधी उडवी बिनतोड

प्रणयभावना प्रीति—जनांची नेई वाहून
अंतरांतली भाव-मुग्धता वदवी स्पर्शून
प्रीति-गान नव गोड गुंफुनी गाई कानांत
विद्युद्वेगें प्रतिध्वनी ते घुमवी विश्वांत
हृत्संदेशीं भरली जादू मोहुन जी टाकी
शरदृतूची खुली मोहिनी आतुरता ओकी
अरुण-प्रभा जें आणी रविला मोदुन गगनांत
शरदृतूची तशी होतसे प्रीतीवर मात
सरला श्रीधर गुंगत होतीं प्रीती-गानांत
वसंत जीवें हर्षभरानें करीतसे सांथ

आश्विनांतली नर्क—चतुर्दशि आली दिपवाळी
प्रातःकालीं दीप तळपती झळाळल्या ओळी
तारे लोपुन प्राचि दिशेला उठली नव कांती
पहांटवारे मंजुल नादुन मोदें तिज गाती
कुठें कोकिला भारद्वाजहि ललकारुन उडती
'चिंव चिंव' चिमण्या करून कोठें फळपांसह जाती
तरु-शिखरावर बसती रावे कोठें ऐटींत
डुलवुन झेंडा उडून जाती मोदें गगनांत
थंडीचा पण कडका फिरला फुटला ओठांत
दांत वाजती थरथर, भरते हुडहुडि पोटांत
तरी चमकल्या रामपुऱ्याला दीपांच्या ओळी
लखलखलें तें तेज तयांचें मंगल शुभ वेळीं
आकाशींची अरुण—रक्तिमा उतरे त्या स्थानीं
किंवा पसरे तेज रवीच्या नव—प्रभेवाणी
सूर नादले गोड कुठें ते मंगल वाद्यांचे
झडतच होते चौघड्यांतुनी नाद दमाम्याचे
मधून उडते संदुक कोठें बार बंदुकांचे
मुलें उडविती हवेंत पोकळ बार फटाक्यांचे

कुणी घालिती आर्या अंगणिं सडा गोमयाचा
कुठें घालिला गुलाल भरुनी पट रांगोळ्यांचा
अभ्यंगानें कुणी घालिती स्नानें आतांना
उटणें लाविति कितीक भगिनी आपुल्या भावांना
थरथर उडती अधर, तरि कुणी अडुन उभ्या भगिनी
'नांवासाठीं,' भरलें ज्यांचें हृदय विनोदांनीं
आनंदाच्या तुषार–माला उडती सर्व घरीं
प्रभातवारा उल्हासाचे पराग त्यांत भरी
श्रीधरचें पण वसंत पुरवी कोड दिवाळींत
सरला खुलवी भावलता नव गोड कौतुकांत
अभ्यंगाचीं स्नानें झालीं दोघांचीं जेव्हां
पुढ्यांत आला प्रेमपुरीचा प्रेमळ करिं मेवा
बहार केली सरलेनें तर रांगोळ्या भरुनी
कौशल्याचा तिनें दाविला कळस तिथें करुनी
पाट मांडिले असेच होते चतुराईपूर्ण
वदन दिसावें श्रीधरचें तिज बघतां कोठून
मित्र-गणासह वसंत श्रीधर विनोद-थट्टांनीं
दिपवाळींचा हर्ष उडविती मधुतर पक्वान्नीं
सरलेची तर आज करावी थट्टा पुरतीच
ठरवुन बसले होते सारे, कौतुकमय मौज
सांजो-यांनीं हात भाजती तरि वाढी सत्वर
सरला हर्षुन वहिनीसंगें खोचुनिया पदर
खुसखुसलेल्या चकल्यांनीं तर मजा और केली
लाडु, जिलेबी, पुऱ्या, करंज्या गोडी खवखवली
प्रीतिकराची जरी भाकरी गोड किती लागे
हा तर होता दिपवाळीचा मेवा अनुरागें
दिव्य माधुरी तयांत भरली प्रीतिकरांतून
सुरलोकींचें अमृत वाटे त्याहुन किति हीन
सहज वाढतां उचंबळे मन आंतुन सरलेचें

नजर बावरी खालुन बघते लोचन श्रीधरचे
भाव तरळती, गोड खुमारी त्यांची विलसावी
गालें खुलवुनि, रोमांचित करि आशा मनिं भावी
तोंच पातला विनोद तेथें रम्य वसंताचा
हांसत उठला गोड ऐकुनी गुलाब सरलेचा
'प्रीतीभोजन सरलेचें हें श्रीधरला झालें
म्हणुनि आज या श्रृंगाराला नूतनपण आलें'
तिरवे डोळे करुन मुरकली मान वांकवून
पदर सांवरी तोंच सांडलें हातांतिल वाण
बघुन हांसला परस्परांना हौसी मित्र-गण
लाजुन गेली सरला, नाहीं आली परतून

मूढ मनाला भविष्यवार्ता उमजेना कांहीं
अनंत आशा डोकवति मग आशामय हृदयीं
जीवन-सागरिं नौकेभंवतीं आशेच्या लाटा
एक तारिते, दुसरी येते तोंच फुटे फांटा
विचार--लहरी उसळत येती मागुन एकीच्या
एक हांसवी, रडवि भावना दुसरी जीवाच्या
लता डोलते वाऱ्यासंगें आनंदें भारी
परी वाळवी खालुन तिजला कणकण पोंखारी
मेघ दाटती घन आकाशीं विद्युत् पण नाचे
परी कळेना झोत खंडिती असंख्य पवनाचे
भरि पिचकारी एक लाट तों भाजि मना एक
भवितव्याची खरी खरी ती तीच उरीं मेख
परि भवितव्यीं भरल्या वाटे सौख्य-सुधा-राशी
म्हणुन नाचती विचार सारे मनांत गुलहौशी
सरला श्रीधर माला गुंफिति प्रीति-मौक्तिकांची
अधीर होउन मानस लक्षी वेळ वहाण्याची

फूल निरामय जरी डोलतें निर्जन रानांत
परिमल त्याचा परि दरवळतो अनंत विश्वांत
प्रीति–फुलांचा सुगंध कांहीं असतो न्याराच
ज्याविण होई खळबळ हृदयीं, तळमळ जीवास
जरी न दिसली सरलेला दिनिं श्रीधरची मूर्ती
व्याकुळ होउन प्राण सर्व ते भरभरुनी उडती
दिवसांतुन जरि शब्द न वदली अडून श्रीधरशीं
झुंजत होती हुरहुरवाणी उदास वृत्तीशीं
लपुन पाहतां नेत्र दिसावे श्रीधरचे लाल
दचकुन होई विस्मित चित्तीं तैं किंचित्काल
सुमन एक परि वसंतसंगें देतां हर्षून
रोम थरारे जरी घेतसे श्रीधर हांसून
श्रीधरची पण तशीच झाली ठेवण नवलाची
संग वाढवी मनिं आतुरता रीतच प्रीतीची
जरि नच फिरली सरला नजरीं चमकुन वेल्हाळ
ह्या भासावी घन तिमिराची छाया करवाल
थट्टा पाहुन जरि न मुरकली गोड, वसंताची
विषण्ण व्हावी वृत्ति हांसरी तिथेंच श्रीधरची
क्षण न विसरला सूचक दृष्टी श्रीधर सरलेची
जीव–विसांवा तोच, नाचवी लहरी हर्षाची
पंथ चालतां दिसला त्याला शालू तसलाच
सरला भासे, दृष्टि बावरी होई तेथेंच
कीं सरलेची चाल चालते ललना अन्य, पथीं
सरला वाटुन शब्द घोळती अधरीं, परि भ्रांती
शब्द ऐकिला तसाच, दुसरा किंवा कानांनीं
शब्द भासुनी सरलेचा तो हरतो भानांनीं
पान हाललें बागेमधलें पवनानें थोडें
अधीर लोचन, हास्य मुखावर विलसावें गोडें
कुठें वाजलें, नाद जाहला ‘खट्कन्’ दाराचा

झुलवित वाटे प्रेमळ मधुतर भावच सरलेचा
परि जेव्हां तें उमजे मानस वारा तो होता
निराश होई, हुरहुरलेला चटका पण चित्ता
सरला पाही श्रीधर जगतीं श्रीधर सरलेला
परस्परांविण कुणी पाहिना जगांत दुसऱ्याला
गेह विसरला श्रीधर अपुलें सर्व मनीं पूर्ण
मुळिं वाटेना घरास जावें सरला सोडून

तरुशिखरावर कुठें जराशीं सोनेरी किरणें
दिन मावळला उन्हें लोपलीं हंबरलीं कुरणें
विहंग-पंक्ती तरु-राजीच्या रोखानें उडती
आणुनि दाणे चोंच भरूनी पिलांस भरवीती
ऐन दुपारीं गळलीं होतीं सुंदर जळमोतीं
दृश्य तयाचें नभीं विलसलें रंगामधिं साती
मिटूं लागली कमलांवरची प्रभा अपोआप
भ्रमर अडकती, मधुरसपानीं भक्ती निष्पाप
लता घालिती माना खालीं कितीक लववून
जाइ जुई किति सुंदरतेनें गेल्या डवरून
चिंतामग्ना चित्तमलीना जाइजुईखालीं
अचल दृष्टिनें रोखित सरला प्रभा मोगऱ्याची
टिपलीं होतीं मोगर-मोतीं जरा ओणवून
परडीमध्यें भरलीं होतीं सारीं रचवून
बाग पाहिली फिरुन एकदा प्रेमळ दृष्टीनें
भरली होती तींतच सारी नाजुक यष्टीनें
मधुर चिंतनीं गढली होती बाला सुकुमार
मन प्रीतीचे गुंफित होते आंतच नव हार
दृष्टीमध्यें लुकलुकलें तें प्रीतीचें तेज
वदनावर मग टवटवलेला अपूर्व ये साज
अलक मोकळे पाठीवरतीं रुळले होऊन

मोर-पिसारा गोंडस नयनां भासावा दुरुन
नाजुक लहरी पवनाची तों झुळझुळली मंद
पदर उडविला नाहीं कळला रेशमी स्वच्छंद
कांहिं गळालीं फुलें शिरावर जाइजुइतून
पसरविलेल्या अलकांवरतीं वृष्टी होऊन
मोतीं भरलें वाटे जुइनें तिच्या शिरोभागीं
जाइ-फुलांनीं कथिलें तिज हें येउन निटिलांगीं
नयनांपुढतीं मोहन मूर्ती फिरत असे दुसरी
मनिं उमजेना तिला सजवितो निसर्ग श्रृंगारीं
वृत्ति हारली, तोंच झांकले नेत्र तिचे कोणीं
येउं नये बाहेर झांकलें मोत्याचें पाणी
देह दचकला, चरकत युवती घाबरला सूर
थरकांपत वच, डबडबलें तें हृदय जाय नूर
घाम निथळला कपोल झाले ओले बिंदूनीं
'को-ण ?' अक्षरें उठलीं वदनीं दोनच अडखळुनी
'दादा ! वहिनी !' कोण असे पण सोडाना आतां !
तोंच निघाले हात, पाहतां श्रीधर तो होता
गोड लाजली, एकच मुरका मारी लडिवाळ
पदर सारुनी दूर जाहली डोलत वेल्हाळ
लावण्यानें बहरुन गेली मुख--चंद्रावरतीं
सौंदर्याची वृथा ऐट त्या गमते चंद्राची
'थट्टा तरि ही कशि आठवली नवलाची बाई !'
बोलुन हातीं पदर धरूनी भूमीतल पाही
मात्र विलसली वदनीं लाली लपलेली सारी
श्रीधर पाही हांसुन कौतुक लुटतो नवलाई
दृष्टि घोळल्या परस्परांच्या नयनांतुन दोन्ही
दाउनि दिधली मनें अधिरता, खळबळ हृदयांनीं
शब्द उठेना पुढें एकही कोणाच्या वदनीं
हरे देहता, मात्र जाहले तन्मय भावांनीं

वसंत भरवी दृष्टीमध्यें वरून नवलाई
कौतुक--भावें बघुनी दोघां भरून घे हृदयीं
हांसत आला विनोदभावें विषण्ण दृष्टींत
खिन्नताच पण उमटत होती उजड पाउलांत
सरला लाजुन निघून गेली दुरुनच पाहून
जणुं न कळावें तिचे झांकले श्रीधरनें नयन
बोलत होता विनोद त्याचा वदनांतुन सांच
मात्र निराशा घालित होती आज मनीं नाच
दीर्घ उसासा बघुन श्रीधरा टाकी श्वसनाचा
शब्द घोळती अधरावर, तरि कुंठित हो वाचा
कंठ दाटला, निराश लहरी पहिली त्या होती
दुःखाश्रू पण दोन गळाले बघवेना वरतीं
शंका सुचवी दृष्टी त्याची श्रीधरला पुढची
विस्मित झाला श्रीधर पाहुन चर्या नवलाची
शब्द उसळला दडेल कैसा मनांत थांबून ?
‘ पुन्हा पण असा दिसेल कां मज होरा परतून ? ’
तोंच पसरली विषण्ण छाया दोघांच्या वदनीं
प्रेत--कळेनें उडी घेतली श्रीधरच्या वदनीं

---

## पाकळी ९ वी.

## दंवाच्छादन.

आशा जाई पुढें मनाला मागें टाकून
घालि निराशा कडका एकच, हृदय करी चूर्ण
शांत शशीचीं कोमल किरणें आशेंतुन गळती
नील घनांची भयाण झाली गर्दी त्यांवरतीं
वाऱ्यासंगें नैराश्याचें घोंघावत भूत

कर्कशता भेसुर अडविते पथ काळोखांत
नव्या लतेची नूतन कलिका खुलली नाजूक
चुरगळली, मातीस मिळाली, विरली मातींत
नभीं पिंगळे भकास गाती निराश कर्कशता
तारे तुटती आकाशांतुन सोडुन तेज-लता
श्रीधर होता, सरलेच्या मनिं हृदिचा हृद्देव
मात्र पित्यानें मानासाठीं विकला तो देह
नैराश्याचा एकच कडका चपलेचाच खरा
सौख्य हारलें हृदय उडालें थिजला देह पुरा
वेळ साधली दुर्दैवानें फांसा अनिवार
पैसा एकच झाला सरला—हृदयाचा हार

पैसा तारी; पैसा मारी, पैसा अधिकारी
पैसा थोरी, पैसा भारी, पैसा सुखकारी
पैसा त्राता, पैसा माता, पैसा एक पिता
पैसा भगिनी, पैसा ग्रहिणी, पैसा प्रिय कांता
पैसा मानी, पैसा हानी, पैसा अपमानी
पैसा साधू, पैसा भोंदू, पैसा प्रेम मनीं
पैसा प्रीती, पैसा कीर्ती, पैसा गुण--कांती
पैसा शांती, पैसा भ्रांती, पैसा विश्रांती
पैसा वैभव, पैसा गौरव, सौष्टव जगिं पैसा
पैसा जीवन, जगतीं मोहन—मंत्र एक पैसा

त्या पैशावर उभी राहिली सरलेची काया
पैशावरतीं प्रीती दिधली पैशाची किमया
तात पाहतो पैसा, बघते माता मान मनीं
मात्र जळाले प्रीति--भाव हे सरलेच्याच मनीं
निश्चय ढळला, धक्का बसला, वसंत—हृदयाला
तीन जिवांला, नाजुक दिधला पैशानें झाला

निर्घृण झाला पिता न समजे माताही नुमजे
नयनीं होतें पटल धनाचें मानाचें सांचें
प्रीति दिलाची विकली जावी वित्तानें कैशी ?
प्रीति मनाची कशी मिळावी मानानें खाशी ?
तरी कुणाला कदर मनाची ? प्रीति कोण मानी ?
ज्यांच्या पुढतीं पैसा दिसतो चंचल अभिमानी
विरतिल साऱ्या ऐहिक इच्छा, क्षणिक पसारा तो
मात्र घाव हा हृदयावरचा जीवन घालवितो
मिळेल पैसा, मिळतिल साऱ्या कांक्षा जगताच्या
मात्र भावना एकदाच्च जगीं उज्ज्वल प्रीतीच्या
सुखें जगावर कितीक असतीं, वैभव तें त्यांचें
सौख्य खरें तें तेंच एकटें सौख्य अंतराचें
विभवें सम्राटाचीं, सुखदा लक्ष्मी भाग्याची
माती गमती, नसतां नजरी प्रेमळ प्रीतीची
सरला बाला वदेल कैशी प्रीति अंतराची ?
नाजुक भाषा कोण उमजतो पाहुन नेत्रांची ?

भाउबिजेचा सण विभवाचा आर्यांचा गोड
प्रीति-सुखाची साक्ष जगावर अखंड बिनमोल
बीज आजची कसली ? होती व्याकुल सुकुमारी
वसंत-नयनीं अश्रु-जलाच्या डबडबल्या लहरी
विचार अपुरे पडती जेव्हां दावाया प्रीत
अखंड गळती अश्रू-धारा, जगताची रीत
ऐन दुपारीं जरा लोटली अंथरुणावरतीं
सरला, व्याकुल प्राण, उडाला जीव हवेवरतीं
सुख-स्वप्नांची गोड माधुरी वदनावर दिसली
दचकुन उठली तोंच फोडिली हृदयें किंकाळी
' मन वेडें हें विचार करितें किती तरी बाई !
दुदैवाचा फांसा उलटा परतणार नाहीं. '

खुळ्या मनाची ओढ जातसे आशेवर अजुनी
तोंच दिसावी कठोर नजरी पितयाची मानी
पुन्हा धांवली आशा प्रेमळ, बघते मातेला
मातृ-प्रीतिची दिव्य शलाका देइल सौख्याला
पुन्हा चमकले अश्रू, वदली वदनांतुन कांहीं
‘ मानच व्हावा, आई ! तुजला सरलेपेक्षांही ! ’
फिरुन लोटली विषण्ण झाली मूर्ती सुकुमार
नयनीं सुटल्या अखंड धारा अश्रू अनिवार

झुळू झुळ वारा वाहुं लागला संध्या--समयाचा
झाडांवरतीं मंजुल घुमली विहगांची वाचा
गुरें चालवी कुणि ओढ्यावर पाणी दावाया
हंबरल्या कुणिं गाई पाहुनि वत्सा, पाजाया
डुलूं लागले वृक्ष, वाहती वारे मोदाचे
धरूं लागले सांथ तयांची गाणें विहगांचें
लता डोलती, बागेमधल्या वायुसवें गोड
मधु सुमनांचा सुगंध खुलवी आशेचे मोड
लता डवरल्या, किती बहरल्या वेली पुष्पांच्या
कलिका खुलल्या कितीक लवल्या भारीं सुमनांच्या
सरला बाला बघूं लागली बागेंतिल वेली
जळली होती गोड जिवाची डुलणारी वेली
फिरतच होती बगिच्यामाजीं जणुं वेडीवाणी
मनांतलें तें वेड कुणाला दाविल उघडोनी ?
दिसे मोगरा नयनांला तों, उठलें काहूर
धस्स जाहलें आणि दडपला भावांनीं ऊर
पाय जाहले जड उचलेना एकहि पद पुढतीं
तरी मोगरा आलिंगुनि ती घाली घट्ट मिठी
कंठ दाटला, परी वाहिलें हृदय खळाळून

चिमण्या, राघू होऊं लागले सांथी गाऊन
अश्रू गाळुन सरला भिजवी खिन्न मोगऱ्याला
त्यानें दिधलें उत्तर तिजला गाळुन सुमनांला
ताठरलेल्या शिरा तयाच्या भिजल्या जरि साऱ्या
तरि न थांबती सरलेच्या मुळिं धारा अश्रूंच्या
' तूंच अर्पिलें हृदय तयांना दावियलें तूंच
आज कसा मग स्वस्थ सख्या ! तूं, भ्रांति मनीं हीच
कुणा दाउं मी अंतर अपुलें, तुजवांचुन कोण ?
तूंच जिवाचा जीव, सख्या तूं प्राणाचा प्राण
तूंच हरविला जीव, पाहिला हृदयाचा ठाव
तूंच दिलाची दौलत सगळी, तुजवरतीं भाव
तूंच दाविला देव, जाहला असुर तूंच आतां
कुणास वाहूं हृदय; पाहिलें एकदाच चित्ता
घांटावरची पूजा बाहिली बांधियली तूंच
हृद्भावांची सुमन--मालिका तोडियली तूंच
कोपलास कां मजवरतीं तूं ? अनाथ भगिनी मी
अंत कशाला बघसीं सखया ! हृदयाचा वर्मी
देव हृदींचा एकच त्याचा देह खरा माझा
कशी देउं मग दुसऱ्याला, जरि असे थोर राजा
मातापितरां एकच आशा नश्वर विभवाची
असूं नये कां जरा कल्पना नाजुक, हृदयाची ?
नको मला सम्राट जरी तो देव स्वर्गींचा
वाचस्पति जरी सरस्वतीचा, कुबेर लक्ष्मीचा'
एकामागुन एक उसळती भाव अंतराचे
जळलेले ते हृदिचे उठले विकार प्रीतीचे
" प्रीतिसाक्ष तूं, हृदयसाक्ष तूं, साक्ष तुझी देवा
दिला एकदां हृद्भावांचा सुखकारी मेवा
माळ अर्पिली तुझी एकदा हृदयाला सांची
भगें तोडिलीं, आज वाहत्यें भाऊ--बीजेची

भगिनी सरला श्रीधरची पण भगिनी विश्वाची
आज बिजेची ओवाळिन मी भगिनी प्रेमाची
प्रीति--भक्तिची नजर तुझी ही व्हावी साक्षीची ”
म्हणुनि वेंचिलीं तिनें जराशीं फुलें मोगऱ्याचीं
अलक-ग्रंथिवर कांहीं बसलीं, वसंत ये तोंच
पाहुनि भिजली हृद्वीणा ती, पुन्हा पडे खांच
तरी वर्षिली सरला--वाणी ध्वनींत गंभीर
“ दादा ! पहिलें हृदय वाहिलें तेथ पुरेपूर
दैव उलटलें, मग कसले जगिं तात तशी माता
कसा उकलतो हृदयावांचुन बंध जगच्चित्ता ”
निश्चय--वाणी ध्वनीत झाली परतुन सरलेची
‘ भगिनी सरला श्रीधरची ती भगिनी विश्वाची ’

---

## पाकळी १० वी.

## विशीर्णता.

रात्र जाहली, प्रभा लोपली संध्या देवीची
चंचल दृष्टी सृष्टि रोखिते तारा राणीची
रातकिड्यांची ‘ किर्र ’ गर्जना भयाणता दावी
मधुन काजवा चमकुन दावी दृष्टीपथ भावी
कोल्हे भुकती, घुमले कानीं भयाण पडसाद
दिवाभितांचे मधून येती घोंघावत नाद
विश्व जाहलें स्तब्ध, हालवी एक न तरु पान
भीषण काळोखांत दडालें सृष्टीचें वदन
हृदया बसला एकच हिसका खडतर भावांचा
पाडुनि गेला नसांनसांवर श्रीधरला खांचा
तुटला आशा-तंतू, सुटला धीर मानसाचा

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ३०५७ ... प्रत १३६०

फुटला घट प्रीतीचा, सरला दिन आनंदाचा
कोण देतसे धीर अंबरा, उचली नग कोण ?
कोण फाडितो सागर, नाचे लाटांवर कोण ?
कोण अडवितो पवन, वाहतो वायुसवें कोण ?
प्रीतीसाठीं हृदय भडभडे, रिझवी तें कोण ?
श्रीधरला जग विपण्ण झालें, दीन देह झाला
चित्त उडालें, भाव जळालें, जीव विकल झाला
फुलें हांसती तिथें पसरले कांटे घनघोर
प्रभाकराच्या किरणांमधिंही तिमिर दिसे थोर

श्वास कोंडला जीव छेडितो निश्वासी ताना
चिंतामध्यें खिन्न भावना खळबळती नाना
तीव्र जाहल्या गोड भावना हंसऱ्या, जीवाच्या
उग्र कल्पना धुमसत होत्या नाजूक, हृदयाच्या
शांत मनाचे भव्य मनोरे ढांसळले सारे
हाय ! हवेंतील किल्ले सगळे डळमळले प्यारे
नैराश्याची भीषण ज्वाला जाळी जीवास
उदासतेची कराल दाढा फाडी हृदयास
मनःसागरीं वादळ भारी फोंफावत उसळे
तारूं त्याचें गिरके घेउन जात कुठें न कळे
दैवच फिरलें तेव्हां देई सहाय्य तें कोण ?
हृदयावरचा घाव झांकतो, मन रिझवुन कोण ?
व्यर्थ दुराशा जांचत होती घालाया बेडी
कोण सोडितो आतां सारीं हृदयाचीं कोडीं ?
निराश झालें जग हें सारें निराश हृद्दर्दी
येईल कैसा हृदय-रंजना हृदयाचा दर्दी ?
पाझर फुटले कारुण्याचे, थबथबले नेत्र
निश्चल झाल्या वृत्ती साऱ्या स्थिरावले गात्र
त्या अश्रूंची माळ कुणाच्या कंठीं घालील ?

कोण जिवाचा पंचीप्यारा हृदया झुलवील ?
ज्वाला उठती नसांनसांतुन श्रीधरच्या आज
आग धडधडे, जीव तडफडे कडकडली वीज १४००
पंथ चालतो समाधिचा तो विषण्णे हृदयानें
कांटा बोंचे चांचपडे तरि उजड पाउलानें
ओढ्यावरच्या वृक्षांची ती छाया घनदाट
वाटे त्याला, रखरखलेलें तिथें वाळवंट
शांत समाधी खिन्न भासली ओढा पण खिन्न
मधु सुमनांचा सुगंध वदतो ' आस प्रीति भिन्न '
दर्शन घ्यावें समाधिचें पण वंदी ओढ्याला
फूल वहावें तरी वाहतो पान समाधीला
शांत होतसे तिथेंच वृत्ती त्याची पूर्वीची
आज होतसे बधीर वृत्ती तिथेंच हृदयाची
फिरतो इकडे तिकडे कितितरि निर्हेतुकभावें
' प्रीती ! ' ' सरला ! ' करीत पुसतो अश्रू , मुख रडवें
भरलें होतें हृदय, गळाले अश्रु इथें सारे
दिशा दिशांतुन घुमूं लागलें प्रीतिगान प्यारें १४१४
शार्दूल--विक्रीडित वृत्तः—
नाहीं मीलन कां खरोखर पुढें अंतीं निराशाच कां ?
या भालीं विधिचें असे लिखित हें अंतीं निराशाच कां ?
दावाया प्रभुची नितांत किमया अंतीं निराशाच कां ?
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच कां ?
प्रीती शोधुं कुठें ? जगावर मला सांगा कुणी हो झणी
प्रीती पाहुं कुठें कशांत ? मजसी दावून द्या हो कुणी
' प्रीती ! प्रीति ' करीत चित्त रडतें, जांचे मना भावना
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना ?
प्रीतीसाठिं भणंग होउनि जगीं रानें किती हेरलीं
प्रीतीसाठिं तरुवरी बसुनि मी पानें पहा शोधिलीं
पुष्पांतील पराग आतुर वघे प्रीती तिथें कामना

प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना !
प्रीतीसाठिं नभांत उंच उडलों पक्ष्यासवें हर्षुनी
प्रीतीसाठिं भरारलों बहुपरी वाऱ्यासवें वाहुनी
सिंधूची पण लाट फाडुन बघे प्रीती दिसे तेथ ना
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना
बाजारीं फिरलों, घरांत शिरलों, रस्त्यावरी थांबलों
शेजारीं रुसलों, उगीच बसलों बागेंतही हिंडलों
धुंडाळीत फिरे दिसे तरि मना पार्थीव त्या कल्पना
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना !
हृत्तंतूवर ताण एकच हवी, छेडा कुणी प्रीतिची
भावांची पण एक ओंजळ कुणी ओता नव्या प्रीतिची
आहे आतुर फार मानस, झुरे भोळी मनोभावना
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना
प्रीती चीज कशी ? कशी तरि कृती ? वृत्ती कशी प्रीतिची ?
मूर्ती कैशि तिची ? धृती तरि कशी ? पूर्ती कशी प्रीतिची ?
वल्ली प्रीति कशी ? अधीर मन हें, आतूरता लोचना
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना !
खेळो प्रीति मनीं सदैव, विहरो कानीं ध्वनी मंजुल
ध्यानीं प्रीति दिसो, सुनीत घुमवो गानीं तिचे कोकिल
भानीं प्रीति वसो, खनी अवनिची प्रीती मनीं घोषणा
प्रीतीच्या हृदयांत भीषण वसे अंतीं निराशाच ना !
प्रीतीचा अभिषेक मंगल करो हा जीव भूमीवर
प्रीती चारु तुषार वर्षुनि सदा घालो वरी पांखर
इच्छा ही मन्मनिंची विरून सगळी व्हावी अशी फोल ना !
प्रीतीच्या हृदयांत भीषण वसे अंतीं निराशाच ना !
दृष्टीसी न दिसे करांतहि नसे वृष्टी तरी होतसे
स्पर्शाला न शिवे, कळे नच रवें, सन्नीध ती येतसे
अंतस्फूर्ति तिची सखी जिवलगी आलिंगिते भावना
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशाच ना !

शब्दांनीं नुमजे, जनीं न समजे, शोधी तरी अंतर
लाखांनीं बिनमोल, मोल पण तें हृत्तंतुचें पांखर
कोठें कांहिं नसे तरी वसतसे जीवांतल्या जीवनीं
प्रीतीच्या हृदयांत भीषण दिसे अंतीं निराशा जनीं
प्रीतीची सरला मनास गमली विश्रांत या स्वर्धुनी
प्रीती निर्झरिणी प्रशांत झुळते कीं रोमरोमांतुनी
चित्ता व्याकुलता, करील सरला निस्तब्ध संवेदना
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच ना !
प्रीतीची पहिलीच डोलत कळी हृब्दाग-शाहींतली
सौंदर्यें सुकुमार राजस परी त्या देवशाहींतली
सौगंधें मधु गंध दंग करिते भू-भृंग-पंक्तीस ना !
अंतीं भंग कुठें सुगंध ? वदते ‘ अंतीं निराशाच ना ! ’
आशा पालवली, कळी उमलली, चित्तांतली नाजुक
वृत्ती मोहरली, सुधाच गमली दिव्यांतली साजुक
प्रीती-लाभ खरा म्हणून हंसलें हें चित्त मोदून ना !
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच ना !
जेथें बाग खुले, धरा पण फुले, जाई जुईच्या मिषें
देही भान भुले, लता विखुरती कुंजांतल्या आमिषें
मानी आम्र झुले, विहंगहि डुले आनंद-ऊर्मींत ना !
कां ओसाड अरण्य तेथ ? दिसते अंतीं निराशाच ना !
कासारांत जळीं निळ्या कमलिनी त्या डोलती वायुनें
ज्यांना पाहुन अप्सरा सुर-जगीं गातात मंजु-स्वनें
चंद्राचा नच लागला कर तरी आनंद देतील कां ?
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच कां !
वैशाखीं रविच्या सतप्त किरणें तापून जांजावला
विश्रांतीकरितां तरू वरियला, तृष्णार्त झाला भला
मेघा चातक आर्जवी नभिं दिसे वैशाखिंचा मेघ कां ?
होता मेघ परंतु शुष्क, ‘वदला अंतीं निराशाच का’ !
प्रीतीची लडिवाळ खोंच सरला दृष्टींत कीं सांठली

प्रीतींची अरुवार नाजुक धृती हास्यीं जणूं रंगली
हस्तांदोलन गोंड सुंदर तिची पूर्ती गमे मन्मना
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच ना !
सत्याभास खरा, पथांत दिसला नेत्रांस या सुंदर
दृष्टीमीलन होत लाजुन गमे प्रीतीस ये मोहर
कैशी प्रीति खुळी ? कशास भुलली ? शंका विशंका मनीं
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशा जनीं
प्रीतीचा चटका, मनास झटका, वाटे तरी माधुरी
प्रीतीचा अनुराग राग लटका, दई खुमारी तरी
चातुर्यांत दिसे खरी रसिकता प्रीतींत ही हर्षुनी
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशा जनीं
प्रीतीलाभ म्हणून हांसत उडे हें भाबडें मानस
दिव्याशीं हितगूज बोल उठती ते बोबडे राजस
गेले बोल विरून वायुंत, हरे चित्तांतली ईपणा
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच ना !
सोनेरी पटलीं सुरेख उठलें हृच्चित्र या आयुचें
आनंदांत सुरेल तान भरली, गाणें धुमे प्रीतिचें
गेलें गान, तसें दिसे न नयनां तें चित्र तें प्रेम ना
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच ना !
वाटे जीवन रुक्ष हें विपिन कीं खोरीं दरीं हीं महा
कांटेरी पथ आडवा, किति तरी त्या श्वापदांच्या गुहा
ती होईल कशी इथून सुटका रानांत राजीव कां ?
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशाच कां ?
नेत्रीं शून्य निराशता, विहरती दृष्टीपुढें काजवे
हृद्रंगा निधळून गात सुटले अश्रू तिचे गोडवे
ओष्ठीं शब्द फुटे, स्वांत रसना ही आडली माजुरी
रक्तानेंच भगा ! लिहून चुकला अंतीं निराशा पुरी !
जाती हात धरावया प्रियसखी प्रीतीस कीं मोडुन
होती ओठ पुढें रसाळ नवखें तें घ्यावया चुंबन

धक्का तोंच विदारणा करितसे, झाली तिथें ताडना
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !
झालें आयु फुकें, जगांत सुटला आधार जीवांतुन
गेले रम्य विचार सोडुन मला, कांक्षा किती नूतन
राही मात्र मना, स्मृती हुरहुरी जी लाविते स्पर्शुनी
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशा जनीं
प्रीतीची लडिवाळ गोड नजरी झाली विषारी पुरी
प्रीती-हास्य कराल चित्त चिरितें हृद्भावनांची सुरी
भावांचा थरकांप नेत्र बघतां नेला पुन्हा चोरुनी
नाहीं मीलन ना, खरोखर पुढें अंतीं निराशा जनीं
जीवाची जळती चिता धडकते आकाशभेदी जंव
ज्वाला आर्त कराल, त्यांतुन सदा भेसूर गर्जे रव
त्यांचा नाद घुमे, दिगंतरिं नसे तो जाळितो मन्मना
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !
झाडें पेटुन धूर जात गगनीं ज्वाला उठे शेवटीं
ज्यांची आंस वनास खांक करिते रक्षा उरे शेवटीं
तेथें कोकिल सुप्त, हर्षुन पुढें गाईल ' कू हू ' न कां ?
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच कां ?
गेला कोकिल गाउनी उडुनि तो प्रीतींतली माधुरी
गेला गोड दिगंतरीं घुमवुनी नादांत प्रीती पुरी
आतां भास, मनास जाळित असे ती गोड संवेदना
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !
ध्याऊं काय जगीं, बघूं तरि कुणा, पाहूं कुठें काय मी ?
गाऊं काय, कुणा कशास्तव तरी दाऊं कुणा गाउनी ?
हांका मारुं कुणा ? कुणासह वदूं ? कोणा स्मरे वासना ?
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !
पुष्पांतील सुगंध सर्व विरला वायूसवें वाहुनी
निर्माल्यांतच शुष्कता कटु किती आतां असे जीवनीं
मातीमोल जिणें भयाण ठरतो हा जीव प्रीतीविना

नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !
झालें रान भयाण, विश्व मजला भेसूर ही आपदा
झालें कानन घोर, सृष्टि सगळी माझी मला तापदा
देहाची अरुवार कोमल लता ही भाजली पोळुनी
नाहीं मीलन कां खरोखर पुढें ? अंतीं निराशा जनीं
जाते रात्र, उजाडतो दिन नवा, सृष्टी नवी हांसते
चैतन्यें फुलुनी नवीन खुलते, आनंदुनी रंगते
आयुष्यांत मला दिसेल नच कां आनंद एक्या दिनीं ?
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच जनीं.
नाहीं कां दिसणार या जगिं मला प्रीति-प्रभा सोज्वळ ?
नाहीं कां पडणार हस्त कधिंही कंठांमधीं कोमल ?
नाहीं कां हांसणार प्रीति मजशीं ती एकदा लाजुनी ?
नाहीं मीलन कां खरोखर पुढें ? अंतीं निराशा जनीं
तारे हे हंसरे अतां वरुषती शून्यत्व हें व्याकुल
गेले हे घन शुष्क, आज दिसती सारे कसे चंचल !
वायूंतून तरी निराश--लहरी ही जातसे स्पर्शुनी
नाहीं मीलन ना खरोखर पुढें ? अंतीं निराशा जनीं.
ओढा तोच अतां पहा स्रवतसे नैराश्य--जंजाळ हा
जेथें प्रीति फुले, फुलें पसरलीं लाजून मोदें अहा !
सारे हे फिरलेच दैव फिरतां, कारुण्य ये ना कुणा
नाहीं मीलन ना खरोखर पुढें ? अंतीं निराशाच ना !
विश्वाची जड शृंखला जखडिते पार्थीव देहास या
जीवाची गति मंद फार पडते प्रीतीस भेटावया
भावांची तर जाळते अधिरता, जाज्वल्य ती वेदना
नाहीं मीलन ना खरोखर पुढें अंतीं निराशाच ना !
दिव्याची प्रतिभा समाध जगतीं ही दाविते मंगलें
प्रीती--साक्ष म्हणून भक्ति भरुनी ही पूजिली प्रेमलें
दैवाघात कधीं फिरूं न शकतो, दिव्यांतही शक्ति ना
नाहीं मीलन ना खरोखर पुढें ? अंतीं निराशाच ना !

दैवाला नमवी, भगास रडवी, शक्ती अशी ही कुणा ?
तोडाया बिसतंतुची मृदुलता चिच्छक्ति ऐशी कुणा ?
दिव्याची हरते प्रभा मग कशी येईल मूढा मना ?
प्रीतीच्या वणव्यांत विश्व जळतें प्रीती मिळे कां कुणा ?

---

## पाकळी ११ वी.

## दिव्यत्व.

रसना अडली शब्द उठेना एकहि मग वदनीं
विचार सरले, तरी शांतता येई ना ध्यानीं
हलका झाला हृदय--भार तो वाहुन शब्दांनीं
निथळत होती करुणा--वाणी खळखळ अश्रूंनीं
नेत्र जाहले लाल, उडाले ओठ अपोआप
हुंदक्यांतुन स्फुंदत होती हृदयाची धाप
शब्द थांब , तरी हुडहुडी उसळे अनिरुद्ध
आंतुन म । हांक कुणिं, करी हृदयाला विद्ध
' हर ! हर . देवा ! व्यर्थ जिणें हें, व्यर्थ देह सांचा '
म्हणुनि मारिला कर भालावर निराश भावांचा
तोंच हालली छाया काळी भयाण, त्या रात्रीं
थरारले रोमांच भयानक श्रीधरच्या गात्रीं
पाय परतला मागें, त्याचें ध- डलें चित्त
काळ पातला, धसका बसला, थरथरले हात
भान हरपलें, भाव करपले, हरला तो धीर
ऊर दडपलें, चित्त झडपलें, घाबरला फार
चित्र हालतें जवळ येतसे जीव उडे त्याचा
पदर सरकला, नाद जाहला हस्त--कंकणांचा
शब्द अडकला, मात्र मनाची आशा पालवली
देह दचकला, तरी दिलाची वृत्ती मोहरली

जीव चरकला, तरी वाहते आशा भरधांव
हृदय हदरलें, तरी आंतुनी जीव बघे ठाव
मनीं बावरा हांक मारितो उतरे तो नूर
शूर कांपरा, तयांत भरली करुणा लाचार
तरी निघाले स्वर घाबरते ‘ सरला ! ’ ‘ कोण ? ’ असे
हळूच आलें उत्तर ‘ श्रीधर ’ गंभिर थांबुनसें
हर्ष उदेला किंचित् हंसली रदनांची माला
तोंच भयानक विषण्णता ये, रडवी हृदयाला
‘ हाय ! कशाला सरले ! बघसीं हृदयाचे घाव
प्रीती हरली पुरी, मिळूं दे अश्रूंना वाव ’
पुन्हा थांबला, खरेच दिसले अश्रू नयनांत
खळूं लागले, पुसती प्रेमें सरलेचे हात
स्पर्श जाहला, रोम उसळले देहावर सारे
भाव तरळले, खिन्न वाहती मात्र मनीं वारे
हात पसरले, धाडस झालें ‘ सरले, प्रीतिखनी !
आलिंगनिं हृदिं तान छेडुं दे गोड वल्लकीवाणी ’
तोंच निघाली ‘ खबरदार ! ’ ही वाणी भरदार
‘ धिक् धिक् प्रीती अशी पाशवी ’ करिते धिक्कार
मनीं चरकला एकच हिसका बसला हृदयाला
काया पडली धरणीवर ती सांवरिते सरला
‘ सरले ! बघसीं अंत कशाला श्रीधरचा आतां ?
झणीं जाउं दे स्वर्गी, किंवा देई कर हाता ’
कोमलता हृदयांतुन खळली सरलेची आतां
नाजुक झाली खरी भावना भाजी पण चित्ता
हृदय वाहिलें कपोल धुतले अश्रूंनीं दोन्ही
‘श्रीधर !’ उठला शब्द पुन्हा पण ‘श्रीधर!’ हलहलुनी
“ प्रीति राहते आलिंगनिं कां ? खुळी कल्पना ती
प्रीति राहते करांत कैशी ? भोळी ही वृत्ती
प्रीति घोळते अधरावर कां, देहीं ती नाचे ?

प्रीति कपोलीं बसली तरि नादान वेंड सांचें
बहिरंगांवर प्रीती करिती शूकर, श्वान जगीं
अभिनय लटका, प्रीती त्यावर चंचलता भोगी
प्रीति झुलतसे शृंगारीं कां प्रासादीं सजली ?
प्रीति हांसते गात्रांतुन कां भूषणांत दिसली ?
प्रीति सांडली रस्त्यावर कां वनांत वावरते
प्रीति वाहते वायूसंगें, जलांत कां दिसते ?
प्रीती उडते विहगामागें, हंसते कां त्याशीं ?
प्रीति बैसली सुमनीं, राजी करिते कां तरुशीं ? ”
दिव्य प्रीतिचें तेज विलसलें सरलेच्या नयनीं
रसवंतीची सोज्वळ वाणी विहरे शब्दांनीं
“ नको प्रीतिला मान, धनाची हांव नसे तिजला
अलंकार वा श्रृंगाराचा हव्यास न तिजला
प्रीति वांछिते प्रीती जगतीं, तेंच तिचें इष्ट
प्रीतीवांचुन तुच्छ जगत वा अमर जरि श्रेष्ठ
प्रीति दिसेना जगांत किंवा नभांत कीं स्वर्गीं
प्रीती हृदयांतरीं वसतसे, तिथें तिची स्फूर्ती
प्रीति झांकलें माणिक सुंदर, अंतरांत दडली
ज्याला पारख हृदयाची ती त्यावरतीं रमली
भरला सागर प्रीतीचा हृदिं खळबळतो भारी
स्रवतो नयनीं मौक्तिक–माला अखंड दिलूप्यारी
मेघ दाटती घन हृदयावर प्रीतीचे नील
माल पाहिजे वर्षावाला प्रीति-वात-झोल
कुठें झांकली, कशी सांचली प्रीति अंतरांत
दर्दी समजे, दुजा न उमजे प्रीतीचा हेत
प्रीति झुरतसे फटका बसतां एकच हृदयाला
प्रीति विरतसे चैतन्यांतच घेउन कलिजाला
प्रीति स्रवते झडप घालितां कलिजाला काळ
ओसंडुनि वाहते तोडतां हृदयाची माळ

३२५

प्रीती रडते भाव गाळतां हृदयांतुन एक
प्रीति फिरतसे प्रीतीसाठीं भणंग जगतांत
प्रीति पाहिजे धीरा ! जगतीं सुवरा ! गंभीरा !
प्रीतीसाठीं हृदय वहावें तुडवुनि देह पुरा
देह कुणाचा असो, नसावी देहाची कदर
हृदय पाहिजे, तिथेंच झुळते प्रीती चारुतर
सुमन कशाचें, कुणीं खुडावें, करो कुणी माती
सुगंध सारा भरवुनि घ्यावा अपुल्या हृदयांतीं "
स्त्रवतांच होती ऊज्वल वाणी सरलेची दिव्य
थकूं लागलें सांथ कराया अभिनव हें काव्य.
' उफाळत्या ज्वालेंत धरावा देह प्रीतिसाठीं
काळाच्या खाईत पुरावा जीव प्रीतिसाठीं '
कुठुन पातलें स्फुरलेलें हें नूतन चैतन्य
धन्य ! धन्य ! ती अबला, व्यर्थच तिजवांचुन अन्य
स्फुरूं लागली रसवंती ती पुन्हा उठे शब्द
" प्रीति हवी कां सरला ? बोला शेवटला शब्द. "
पृच्छा एकच, उत्तर एकच, एकच पण शब्द
विचार उठले श्रीधर-हृदयीं अनंत जणु अब्द
निश्चय त्यांतुन ठरला वाटे निश्चल मनिं झाला
' हवी कशाला नश्वर काया ? प्रीति जरी सरला !'
पुन्हा जाहली पृच्छा दुसरी प्रेमळ, सरलेची
दिव्यत्वाची खरी खनी ती, पृच्छा दिव्याची
' सरला प्रीती, प्रीतिच सरला, काया ही नष्ट
भगिनी सरला जरी, तींत ती प्रीती संतुष्ट. "

प्रीतीचा आनंद विखुरला भगिनी बंधूंत
पुन्हा निघाले ' दादा !' ' ताई !' शब्द भाग्यवंत
प्रेमालिंगन, गुपित उकललें तिथेंच हृदयाचें
शिरें नमविलीं समाधिवरतीं वंदन दिव्याचें

REFBK 0003971

REFBK-0003971